रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ६५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)




# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹


## सागरी मंडळाच्या कृपेने कोकणकरांना
# बाप्पा पावला

### गणेशोत्सवात मुंबईहून कोकणात केवळ सहा तासांत पोहोचणार

### विजयदुर्ग-मुंबई रो-रो सेवेची २० ऑगस्टनंतर चाचणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**गणेशोत्सवानिमित्त मुंबईहून कोकणात जाणाऱ्यांना प्रवासाचा एक अतिजलद पर्याय उपलब्ध होणार आहे. मुंबई, विजयदुर्ग, देवगड, सिंधुदुर्ग रो-रो सेवा गणेश चतुर्थीपूर्वी सुरू करण्याचा निर्णय महाराष्ट्र सागरी मंडळाने घेतला आहे. त्यानुसार विजयदुर्ग येथील जेट्टीत सुधारणा करण्यासह मुंबईतील माझगाव येथे रो-रो सेवेच्या दृष्टीने पायाभूत सुविधा विकसित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.**

हे काम २० ऑगस्टपर्यंत पूर्ण करून तात्काळ रो-रो सेवेच्या चाचण्या (ट्रायल रन) करण्यात येणार आहेत. ही सेवा सुरू झाल्यास गणेशोत्सवासाठी मुंबईतून कोकणात, विजयदुर्ग, देवगडला केवळ सहा तासांत पोहोचता येणार आहे. रो-रो सेवेच्या दिवसाला दोन फेऱ्या (येणारी-जाणारी) होणार असून यावेळी बोटीतून एका वेळी ५० ते ६० चारचाकी वाहने आणि ४०० ते ५०० प्रवासी जाऊ शकतील.

### ■ दिवसाला दोन फेऱ्या होणार, ६० चारचाकी आणि ५०० प्रवासी क्षमता

मुंबई ते मांडवा अशी रो-रो सेवा पुरविणाऱ्या एमटूएम कंपनीची एक बोट मुंबई ते विजयदुर्गदरम्यान धावणार आहे. ही बोट दोन ते तीन मजली आहे. देवगड, मालवण, राजापूरला जाणाऱ्या प्रवाशांसाठी हा एक चांगला पर्याय असेल आणि याला चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास बंदर प्राधिकरणाने व्यक्त केला. तेथे पोहोचण्यासाठी कोकण रेल्वेने किमान १० ते ११ तास प्रवास करावा लागतो, तर एसटीने वाहतूक कोंडीचा सामना करीत १४ तासांहून अधिक वेळ लागतो. लवकरच दर निश्चित करून जाहीर करण्यात येतील. त्यानंतर आरक्षणाला सुरुवात होईल.

**गणेशोत्सव म्हटलं कि, चाकरमान्यांची पावले गावाकडे वळतात. पंधरा दिवस अगोदरपासून कोकणवासीय गावांमध्ये दाखल होतात. गावाकडे जाण्यासाठी चाकरमान्यांना कोकण रेल्वे आणि मुंबई-गोवा महामार्ग हे पर्याय आहेत. कोकण रेल्वेपेक्षा मुंबई-गोवा महामार्गाने एसटीने किंवा खासगी वाहनांनी जाणे चाकरमानी पसंत करतात. मुंबई -गोवा महामार्गाची असणारी परिस्थिती लक्षात घेता वाहतूक कोंडीला चाकरमान्यांना सामोरे जावे लागते. यासाठी रेल्वेने रो-रो सेवा सुरु केली आहेच परंतु आता सागरी जलप्रवासी वाहतूक करण्यासाठी सागरी मंडळाने परवानगी दिल्याने रो-रो सेवा हा चाकरमान्यांना नवा पर्याय उपलब्ध होणार आहे.**




## दोन जवान शहीद

**जम्मू काश्मीर :** काश्मीरमधील कुलगाम मध्ये ऑपरेशन अखलदरम्यान दोन जवान शहीद झाले आहेत, तर एका दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून कुलगाममध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. मात्र शनिवारी सकाळी चकमक तीव्र झाली आणि जोरदार गोळीबार झाला. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये १० सुरक्षा कर्मचारी जखमी झाले, तर दोन जवान शहीद झाले. सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये अद्याप चकमक सुरू आहे. सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांना सर्व बाजूंनी घेरले आहे. ऑपरेशन महादेवद्वारे सुरक्षा दलांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यांतील गुन्हेगारांना ठार केल्यापासून, दहशतवादी संतप्त झाले असून, त्यांच्याकडून सतत कट रचले जात आहेत. •> पान २ वर

## दिल्लीत भिंत कोसळली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आग्नेय दिल्लीतील जैतपूर पोलीस स्टेशन परिसरात एक अपघात घडला. सकाळी ९.३० च्या सुमारास, समाधीस्थळाची १०० फूट लांबीची भिंत अचानक कोसळली. ज्यामुळे जवळच्या अनेक झोपडपट्ट्या त्याच्या विळख्यात आल्या. ढिगाऱ्याखालून ८ जणांना वाचवण्यात आले. त्यांना एम्स ट्रॉमा सेंटर आणि सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान ७ जणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली पोलीस, अग्निशमन दल आणि एनडीआरएफच्या टीम घटनास्थळी तैनात आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये आणि भिंतीखाली आणखी कोणी गाडले आहे का याचा शोध घेतला जात आहे. मृतांमध्ये तीन पुरुष, दोन महिला आणि दोन मुलींचा समावेश आहे. सर्वांची ओळख पटली आहे. रुबिना (२५ वर्ष), डॉली (२५ वर्ष), रुखसाना (६ वर्ष) आणि हसिना (७ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत. जखमी हिसबुलवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शनिवारी (दि.९) सकाळी साडेनऊच्या सुमारास हरी नगर गावाच्या मागे असलेल्या झोपडपट्टीवर समाधीस्थळाची भिंत कोसळल्याने हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस ५ ते ७ मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. लोकांच्या मदतीने आणि जेसीबी बोलावून लोकांना तेथून बाहेर काढण्यात आले. त्यांना दोन वेगवेगळ्या रुग्णालयात पाठवण्यात आले. इतर विभागांचे पथकही •> पान २ वर






## विद्युत धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**दिघी :** श्रीवर्धन तालुक्यातील कुडगाव येथील ३० वर्षीय भावेश नरेंद्र पोवळे यांचा बँक ऑफ महाराष्ट्रच्या दिघी शाखेतील एटीएममध्ये पैसे काढताना विद्युत धक्क्याने मृत्यू झाला. शुक्रवारी (दि.८) सायंकाळी घडलेल्या या घटनेने तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास •> पान २ वर

## अवजड वाहतूक बंदी फक्त कागदावरच

### जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली

**। प्रमोद जाधव । अलिबाग ।**

जिल्ह्यातील आठ पूल धोकादायक असल्याने जिल्हाधिकारी यांनी या पुलांवरून अवजड वाहनांना तात्काळ बंदीचे आदेश जारी केले होते. आठ दिवसांपूर्वी हे आदेश काढले होते. परंतु अलिबाग रोहा मार्गावरील नवघर व रामराज पुलावरून मोठ मोठे खासगी ट्रक, डंपरची खुलेआमपणे वाहतूक होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांची अवजड वाहतूक बंदी फक्त कागदावरच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पुलावर अवजड वाहतूक बंदीचा फलक लावण्यासही सा.बां. विभाग उदासीन ठरले आहे. विजना कन्स्लटींग इंजिनिअरींग प्रा. लि. या संस्थेमार्फत अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, पोयनाड-उसर-भादाणे व भाकरवड-देहेन या मार्गांवरील एकूण ८ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले. •> पान २ वर



## ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

**उल्हासनगर :** मुंब्रा ते भिवंडीपर्यंत विस्तारलेलं एमडी ड्रग्जचं जाळं उल्हासनगर गुन्हे शाखेच्या धडाकेबाज कारवाईत उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवाईत तब्बल २६ लाख रुपयांचा मेफेड्रोन जप्त करण्यात आले असून एका महिलेपासून नायजेरियन नागरिकापर्यंत पाच आरोपींच्या टोळीचा पर्दाफाश करण्यात उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पोलिसांना •> पान २ वर

## आदिवासी दिनाचा उत्सव जल्लोषात

### जिल्ह्यातील आदिवासी समाज एकवटला



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांबरोबरच सभा, व रॅलींमधून हा दिवस उत्साहात साजरा केला. जिल्हयातील आदिवासी समाज एकवटला होता. एक वेगळा उत्साह यानिमित्ताने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून आला. आदिवासी दिनाचा उत्सव जल्लोषात साजरा केला. आदिवासी •> पान २ वर






## अकरावीच्या प्रवेशासाठी मुदतवाढ

**मुंबई :** अकरावी प्रवेशाच्या चार नियमित फेरीनंतर राबविण्यात येत असलेल्या ओपन टू ऑल या फेरींतर्गत ८ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेण्यास अंतिम मुदत होती. मात्र राज्य सरकारने नारळीपौर्णिमा व रक्षाबंधनाची सुटी जाहीर केल्याने या फेरीसाठी सोमवारपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ओपन टू ऑल या फेरीमध्ये प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांना ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून ८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत प्रवेश घेण्यासाठी मुदत दिली होती. या फेरीसाठी प्राधन्यक्रम अंतिम केलेल्या ३ लाख ८१ हजार ४२० विद्यार्थ्यांपैकी ३ लाख ४८ हजार ७८४ विद्यार्थ्यांना त्यांच्या प्राधन्यक्रमानुसार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जागा उपलब्ध केल्या आहेत. ८ ऑगस्टपर्यंत या फेरीअंतर्गत ३ लाख १५ हजार ३११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. यातील नियमित फेरीमध्ये ३ लाख १० हजार ७०८ इतके प्रवेश झाले आहेत. तसेच कोटामध्ये ४ लाख ६०३ इतके प्रवेश झाले आहेत. मात्र •> पान २ वर







# इकोसेन्सिटिव्ह झोनविरोधात शेतकरी एकटवले

| कोलाड | वार्ताहर |

शासनाचे पर्यावरण वने व वातावरण बदल मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली यांनी पर्यावरण संवेदनशील घोषित क्षेत्र घोषित करण्यासाठी ३१ जुलै २०२४ अन्वये रायगड जिल्ह्यातील ७ तालुक्यातील ४३७ गावांचे क्षेत्र वन पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येणार असून रोहा तालुक्यातील ११९ गावांचा यात अंदाजे समावेश येत आहे.तर ज्या गावांचा समावेश होत आहे, अशा ग्रामस्थ शेतकऱ्यांना तलाठीसजा यांच्या वतीने आदी सूचना पत्रक दिले जात आहे. त्यामुळे आता तालुक्यातील ग्रामस्थ शेतकरी एक संघटित होऊन यावर विरोध करत हरकती घेत आहेत.



## मंगळवारी रोहा तहसीलदार, प्रांतांना देणार निवेदन

तर तालुक्यातील चिल्हे देवकान्हे खांब विभागीय शेतकरी संघर्ष समिती संघटनेने यावर हरकती नोंदवल्या तद्नंतर तालुक्यातील असंख्य ग्रामस्थांच्या हालचालींना वेग आला असून येत्या मंगळवारी धामणसई विभागातील ग्रामस्थ शेतकरी हे देखील संघटित होत रोहा तहसीलदार, प्रांताधिकारी, वन उपविभागीय अधिकारी, यांना इकोसेन्सिटिव्ह झोन विरोधात हरकत घेत निवेदन सादर करत आहेत.

रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यातील ४३७ गावांना तर तालुक्यातील ११९ गावांचा समावेश असल्याने यात पिंगळसई,वांदोली, मढाळी, सोनगाव, गावठाण, धामणसई, मालसई, मूठवली, सांगडे, उडदवणे, आदी गावांचा समावेश असल्याने यासाठी विरोध दर्शवित हरकतीसाठी विभागीय ग्राम स्थ शेतकरी एकत्रित संघटित येत शुक्रवारी ८ ऑगस्ट रोजी सोनगाव येथे सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला येथील जवळपास दहा गावातील ग्रामस्थ शेतकरी वर्गाने मोठा प्रतिसात देत उपस्थिती दर्शवली त्यावर हरकतीचा पवित्र घेण्यासाठी येथील ग्रामस्थ या निर्णया विरोधात आक्रमक पवित्रा घेतला असून याबाबत येत्या मंगळवारी १२ ऑगस्ट रोजी रोहा तहसीलदार, प्रांताधिकारी, वन विभाग, जिल्हाधिकारी, तसेच लोक प्रतिनिधींनादेखील निवेदन देण्यात येणार असल्याचे सदरच्या महत्वपूर्ण सभेत सर्वानुमते सांगण्यात आले. यासाठी सर्व समाज बांधव तसेच शेतकरी ग्रामस्थ यांच्या वतीन या विभागाची विभागीय शेतकरी संघर्ष समिती गठित करण्यात आली.

तर सोनगाव येथील मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत आपल्या येथील पिंगळसई पट्ट्यात मेगासिटी आली. त्या ठिकाणी वन पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित करण्यात इकोसेन्सिटिव्ह झोनचे जमिनीवर स्टॅम्प लागले आहेत. त्यामुळे येथील काही शेतकऱ्यांना शासनाने यावर लादलेल्या अटी शर्ती तसेच काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. चिल्हे देवकान्हे विभागीय शेतकरी वर्गाने यावर हरकती घेत निवेदन दिले आहेत तसेच तालुक्यातील जस जसे गावांना आता हे जारी केलेले परिपत्रक मिळत आहे तसतसे येथील शेतकरी ग्रामस्थ हरकत घेत असून ग्रामपंचायत देखील हरकतीचा ठरावा मंजूर करून शासनाला त्यांच्या परिपत्रकानुसार निवेदन देत असल्याची माहिती अरुण आगळे, खेळू ढमाळ, अनंत देशमुख, संतोष खेरटकर आदींनी याबाबत यावर मौलिक मार्गदर्शन केले.

तर सदरच्या आयोजित सभेत इकोसेन्सिटिव्ह झोन यावर हरकत नोंदवित असून याबाबत महत्वपूर्ण सभा संपन्न करण्यात आली असून यात सर्वानुमते धामणसई, मालसई, मढाळी, पिंगळसई या चार ग्रामपंचायतीचे ग्राम सभेचे सर्वानुमते हरकत ठराव घेऊन ते देखील सदरच्या निवेदनासोबत ही निवेदन सदरील अधिकारी वर्गाला देण्यात येणार असल्याचे सदरच्या सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले. यावेळी शेतकरी ग्रामस्थ तथा विभागीय ज्येष्ठ नेते खेळू ढमाळ, युवा नेते अनंता देशमुख, संतोष खेरटकर, अमोल देशमुख, अरुण आगळे, शिवाजी मुटके, सुशील खांडेकर यशवंत मोंडे, अनिल सानप, कल्पेश जंगम, वामन भोईर, रुपेश भोसले, नथुराम मालुसरे, दिनेश रटाटे, शंकर कदम, नरेश गायकर, महेश तुपकर, योगेश जंगम, आदी विभागातील शेतकरी ग्रामस्थ आणि युवक मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# अनिल खेडेकर यांची पोलादपूर शहर मनसे अध्यक्षपदी निवड




| पोलादपूर | वार्ताहर |

शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते अनिल भागोजी खेडेकर यांची शहर मनसे अध्यक्षपदी निवड करण्यात आली. दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष सुबोध जाधव यांच्या हस्ते ही जबाबदारी अनिल खेडेकर यांना प्रदान करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा संपर्क अध्यक्ष दिलीप सांगळे, जिल्हा सचिव अमोल पेणकर, तालुका अध्यक्ष दर्पण दरेकर, शहर उपाध्यक्ष तुषार पवार, प्रफुल्ल पांडे, मुश्ताक मुजावर, मनविसे तालुका अध्यक्ष ओंकार मोहिरे, मनविसे शहर अध्यक्ष प्रवीण पांडे, आदेश गायकवाड उपाध्यक्ष, आदित्य गायकवाड, अथर्व शिंदे, प्रशांत नटे व अनेक निष्ठावान महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. यावेळी अनिल खेडेकर यांची निवड ही जबाबदारीची नवी सुरुवात असून अनिल खेडेकर यांच्या अनुभव, नेतृत्वगुण आणि महाराष्ट्रहिताच्या जाज्वल्य वृत्तीचा पोलादपूर मनसेला निश्चित फायदा होईल, असा विश्वास मनसे कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# महाड अमली पदार्थ प्रकरणी आंतरराज्य धागेदारे सापडले

| महाड | प्रतिनिधी |

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या महाड अमली पदार्थ उत्पादन प्रकरणी पोलिसांनी केलेल्या कारवाईत राज्यांमधील अंतरराष्ट्रीय टोळी सक्रिय असल्याचे निष्पन्न झाले असून याप्रकरणी राजस्थानी एका आरोपीला मुद्देमालासह अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे




## मुद्देमालासह आरोपीला अटक

महाड औद्योगिक वसाहती मधील एका कारखान्यांमध्ये दिनांक २३ जुलै २०२५ रोजी महाड एमआयडीसी पोलीस व आमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करून अमली पदार्थ निर्मिती करणाऱ्या आरोपींसह ८९ कोटींचा मुद्देमाल जप्त केला होता. या प्रकरणी तपास करणारे पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी आपल्या पोलीस दलातील आजपर्यंतच्या अनुभव व कसब याचा वापर करून सदर गुन्ह्यातील यापूर्वी अटक केलेल्या चार आरोपी यांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडील माहिती मिळवून तांत्रिक विषयाच्या आधारे खाते जमा करून सदर अमली पदार्थ हे मध्य प्रदेश व राजस्थान राज्याच्या सीमेवरील हातुनिया गावात राजस्थानमध्ये पाठवण्यात आल्याचे उघड झाले. आंतरराज्य संबंध अवघड होताच वेगवान हालचाली करत पोलिसांची वेगवेगळी पथके तयार केली व त्यांना मार्गदर्शन केले. या पोलीस पथकांना आवश्यक ते मार्ग मदतीसह राजस्थान येथे रवाना केले. त्यानुसार कारवाईस गेलेल्या पथकाने संशयित इसमाचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेऊन माहिती घेतली असता सदर आरोपी यांनी महाड येथील कारवाईची माहिती मिळताच स्वतःकडील मुद्देमाल जमिनीत १० फूट खोल खड्ड्यात गाडून त्यामध्ये पुरून टाकला होता. कारवाई पथकाने जेसीबीच्या सहाय्याने खड्डा उकरून सदर मुद्देमालासह नमुने जप्त केले. याप्रकरणी सिद्धीक फिरोज खान वय २८ राहणार हथुनिया, तालुका जिल्हा प्रतापगड राज्य राजस्थान याला पोलिसांनी अटक केली आहे. परराज्यात अमली पदार्थाचा साठा शोधून काढणाऱ्या पथकाच्या कामगिरी बाबत विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी अभिनंदन केले आहे.

## ट्रेलरची स्कुटीला धडक चालकाचा मृत्यू

**पनवेल :** मुंब्रा महामार्गावरील कळंबोली पोलीस ठाण्याशेजारील सेवा रस्त्यावर कळंबोली गावातील शर्मा बेकरीशेजारी राहणारा अनिकेत जाधव हा कामावर बीमा कॉम्प्लेक्स येथे स्कुटीवरून जात असताना मागून आलेल्या ट्रेलरने अनिकेतच्या स्कूटीला धडक दिली. रस्त्यावर कोसळलेल्या अनिकेतच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने अनिकेत जागीच ठार झाला. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात २३ वर्षीय ट्रेलर चालक शिवप्रकाश वर्मा याच्यावर हलगर्जीपणाने ट्रेलर चालविल्यामुळे गुन्हा नोंद करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके या अधिक तपास करीत आहेत.

# बेलकडे येथे कृषी अधिकारी शेतीच्या बांधावर

## शेतकऱ्यांना केले शेतीचे मार्गदर्शन

| अलिबाग | प्रतिनिधी|

खरीप हंगामाचा काळ सुरु असल्याने कृषी विभागाचे अधिकारी अलिबाग तालुक्यातील बेलकडे येथील जावून तेथील शेतकऱ्यांना भातपिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व मार्गदर्शन केले. थेट शेतीच्या बांधावर जाऊन कृषी शास्त्रज्ञांनी भेट देत पीक पाहणी केली आणि तेथील शेतकऱ्यांना उत्तम पीक घेण्याबाबत मार्गदर्शन देखील केले.



बेलकडे गावात रायगड जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी वंदना शिंदे कृषी उपसंचालक प्रवीण थीगले, शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर, तंत्रअधिकारी सीमा चौधरी, नागावचे मंडळ अधिकारी जगदीश तुंबारे, खंडाळा उपकृषी अधिकारी मोहन सुर्यवशी, बेलकडे सहाय्यक कृषी अधिकारी अशोक मिसाळ, आणि गावातील प्रतिष्ठीत मान्यवर शेतकरी यावेळी उपस्थित होते. बेलकडे येथे आलेल्या कृषी अधिकाऱ्यांना गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतपीकाबाबतच्या समस्या सांगितल्या या समस्यांचे निराकरण आलेल्या अधिकाऱ्यांनी व शास्त्रज्ञांनी केले यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना आपल्या शेतामध्ये विविध पीके घेण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळाले आहे. यामुळे शेतकरी आनंदी झालेले पहायला मिळाले.

# चारिझेन फाउंडेशनतर्फे दप्तरे वाटप

| माणगाव | वार्ताहर|

चारिझेन फाउंडेशनतर्फे तालुक्यातील उमरोली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या व अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला.

चारिझेन फाउंडेशन हे रायगड जिल्ह्यात बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी ठेऊन आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन सातत्याने सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत. माणगाव तालुक्यात या फाउंडेशन मार्फत महिलांसाठी शिलाई कोर्स,विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप, रक्तदान शिबीर असे विविध उपक्रम राबविले जात आहेत. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक आहेत. हे ओळखून या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन देण्याचे काम हे फाउंडेशन निस्वार्थीपणे करीत आहे. तालुक्यातील उमरोली येथील राजिप शाळेच्या विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे दप्तरे देऊन या विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. तसेच उमरोलीतील अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप करून या शाळेत विजेची व पंख्याची सोय केली. चारिझेन फाउंडेशनच्या या उपक्रमाबद्दल त्यांचे उमरोली शाळेतील व अंगणवाडी शाळेतील शिक्षकवर्ग तसेच उमरोली ग्रामस्थांनी कौतुक करीत त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, फाउंडेशनच्या संचालिका पूजा रंधावा, राकेश पडवळ, किशोर झेमस आदी उपस्थित होते.

# माणगावात रिक्षा संघटनेतर्फे नारळी पौर्णिमा उत्साहात

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुका रिक्षा चालक – मालक संघटनेतर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नारळी पौर्णिमा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी,पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे,नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांच्याहस्ते नारळाची पूजा करण्यात आली. यावेळी संघटनेतर्फे निधन झालेले रिक्षा चालक – मालक रफिक जामदार,



राकेश पवार, अशोक सोनार यांना संघटनेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संजयआण्णा साबळे, वाहतूक पोलीस बांडे, संघटनेचे नवीन एसटी स्टॅन्डचे विशेष सल्लागार हुसेनभाई आकुस, नरेश सावंत, पांडुरंग गुजर, अध्यक्ष नामदेव खराडे, उपाध्यक्ष जमाल पिलपिले, उपाध्यक्ष लियाकतभाई रहाटविलकर,सचिव प्रशांत खरे, खजिनदार निलेश आडीत, माजी अध्यक्ष पराग सावंत, सभासद सुनील दासगावकर, दिनेश महाडिक, अनिल शिंदे, विलास चव्हाण, दिनेश जाधव, सुनील अर्बन, संदीप भोनकर, मधुकर गुगळे गणेश जाधव आदींसह सर्व रिक्षा चालक – मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माणगाव तालुका रिक्षा संघटनेतर्फे गेली अनेकवर्षे नारळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा केला जात आहे. यावेळी संघटनेतर्फे गाडी सजवून नारळाची वाजत, गाजत, नाचत मुंबई – गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठ ते काळनदी अशी उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी माणगाव काळ नदीच्या पात्रात नारळाचे उत्साहात विसर्जन करण्यात आले.

पान १ वरून

## दिल्लीत भिंत कोसळली

घटनास्थळी पोहोचले.शुक्रवारी रात्रीपासून राष्ट्रीय राजधानीत पाऊस पडत आहे. ज्यामुळे रक्षाबंधनाच्या दिवशी सकाळी अनेक भागात पाणी साचले. शनिवारी पहाटे, भारतीय हवामान विभागाने उत्तर, पश्चिम, दक्षिण, आग्नेय आणि मध्य दिल्लीच्या काही भागात मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला होता. परंतु नंतर तो यलो अलर्टमध्ये कमी केला आणि लोकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला.

## दोन जवान शहीद

कुलगाममध्ये, जिथे ही चकमक झाली, तेथे सुरक्षा दल गेल्या नऊ दिवसांपासून ऑपरेशन अखल राबवत आहेत. यापूर्वी, या भागात अनेक दहशतवादी लपले असल्याची माहिती मिळाली होती, त्यांचा खात्मा करण्यासाठी, सैन्य आणि जम्मू-काश्मीर पोलीस कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ऑपरेशन राबवले असून, आतापर्यंत अनेक दहशतवाद्यांना ठार मारले आहे.

## ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

यश आले आहे.

१३१ ग्रॅम वजनाचा आणि २६ लाख ३१ हजार १२० रुपयांहून अधिक किमतीचा हा मुद्देमाल ताब्यात घेत, एका महिलेचा सहभाग असलेल्या पाच जणांच्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात एक नायजेरियन नागरिकही अटकेत असून, ही कारवाई आंतरराष्ट्रीय ड्रग्ज नेटवर्ककडे संकेत देणारी ठरत आहे.

ही कारवाई उल्हासनगर गुन्हे शाखेचे राजेंद्र थोरवे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार करण्यात आली. ४ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास नेवाळी परिसरात एक महिला एमडी ड्रग्जसह येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून नौशिन मैनुद्दीन शेख (वय २६, रा. मुंब्रा) हिला रंगेहाथ अटक केली. चौकशीतून पुढे आलेल्या माहितीनुसार, तिचे दोन साथीदार इम्रान खान व हैदरअली शेख यांना मुंब्र्यातून अटक करण्यात आली. यानंतर तपास अधिक खोलवर नेल्यावर, पोलिसांनी मुंबई-नाशिक रोडवरील भिवंडी येथून नायजेरियन नागरिक चुक्स ओगाबोन्ना आजाह आणि त्याचा भारतीय साथीदार सिराज शेख यांना अटक केली. या सगळ्या आरोपींकडून एकूण १३१ ग्रॅम एमडी ड्रग्ज हस्तगत करण्यात आला आहे.

या कारवाईचे नेतृत्व उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश आव्हाड यांनी केले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीरंग गोसावी, प्रवीण खोचरे, गणेश गावडे, राजेंद्र थोरवे, योगेश वाघ, रितेश वंजारी, मंगेश जाधव, मीनाक्षी खेडेकर, प्रसाद तोंडलीकर, विक्रम जाधव, कुसुम शिंदे, संजय शेरमाळे आणि अविनाश पवार या पथकाने केली.

## अवजड वाहतूक बंदी फक्त कागदावरच

त्यामध्ये अलिबाग रोहा मार्गावरील रामराज पूल, नवघर पूल, सुडकोली पूल, स्लॅब कलवर्ट, (पाण्याच्या अडथळ्यावर ठेवलाल सपाट आणि काँक्रिटचा बनवलेला भाग), अलिबाग – रेवदंडा मार्गावरील सहाण पूल, नवेदर बेली पूल, भाकरवड – देहन रस्त्यावरील देहेन पूल या पुलांचा समावेश आहे. या पुलांची व स्लॅब कलवर्टची रस्त्यावरील भार क्षमता पाच ते १६ टन असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील महत्त्वाच्या रस्त्यांवरील पूल व स्लॅब कलवर्ट संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी या आठ धोकादायक पुलांवरून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्काळ बंदी घालणारा आदेश जारी केला. पावसाळ्यामुळे पूल अधिक असुरक्षित झाल्याने वाहनचालकांनी व ट्रान्सपोर्ट संस्थांनी प्रशासनाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे. अपघात टाळण्यासाठी व जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कार्यवाही करण्यात आली असल्याचे लेखी आदेश काढण्यात आले. पुढील आदेश येईपर्यंत बंदी लागू राहणार असून, नियमभंग करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले होते. मात्र अलिबाग रोहा मार्गावरील नवघर, रामराज, सुडकोली येथील धोकादायक पुलांवरून काही खासगी ट्रक, डंपरसारखी अवजड वाहने पहाटेच्या वेळी खुलेआमपणे जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची पायमल्ली काही खासगी अवजड वाहन चालकांकडून होत आहे. याकडे मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांचे अवजड वाहतूक बंदीचे फक्त कागदावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून होत असलेल्या खासगी अवजड वाहनांना रोखणार कधी असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे.

## विद्युत धक्क्याने तरुणाचा मृत्यू

भावेश घरातून दिघीतील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्या एटीएममध्ये गेला. सुमारे पावणे सातच्या सुमारास एटीएमचा दरवाजा उघडताच त्यांना जोरदार विद्युत प्रवाह बसला. ते जागीच कोसळले. स्थानिकांनी तात्काळ त्यांना दिघी व नंतर बोर्लीपंचतन येथील खासगी रुग्णालयात हलवले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेनंतर गावात तसेच तालुक्यात शोककळा पसरली आहे. निष्काळजीपणामुळे अपघात घडल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, एटीएम व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. विद्युत अपघातांमध्ये मृत व्यक्तीच्या वारसांना मदत मिळण्याची अपेक्षा आहे. पोवळे कुटुंबातील आई व भावाचा एक आधार हरपला आहे. त्यामुळे मदतीची मागणी केली जात आहे.

## आदिवासी दिनाचा उत्सव जल्लोषात

समाजाच्या हक्काचे आणि संरक्षण आणि जागरुकता वाढविण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. जागतिक आदिवासी दिन जिल्हा, तालुका व गावपातळीवर वेगवेगळ्या ठिकाणी साजरा करण्यात आला. जागतिक आदिवासी दिनानिमित्त अलिबागमध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक वेशभुषा, नृत्यांचे सादरीकरण करीत असंख्य आदिवासी समाज या निमित्ताने एकवटला.

बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून रॅली सुरुवात करण्यात आली. अलिबागमधील रायगड बाजार येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज चौक, बालाजी नाका, महावीर चौक, एसटी स्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शेतकरी भवन ते कुरुळ येथील क्षात्रैक्य सभागृहापर्यंत रॅली काढण्यात आली. आदिवासी गाण्यांच्या ठेक्यावर अनेकजण नाचत होते. या रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीसोबत खालू बाजे, ताशे, तसेच पारंपारिक वाद्यांचे सादरीकरण करण्यात आले. आदिवासी गीतांचेदेखील सादरीकरण करीत आदिवासी समाजाचे महत्व जनतेपर्यंत पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आले. या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने आदिवासी समाज सहभागी झाला होता. एक वेगळा उत्साह या निमित्ताने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून आला. तरुणांसह महिला, ज्येष्ठ नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते.

## अकरावीच्या प्रवेशासाठी मुदतवाढ

८ ऑगस्ट रोजी मुंबई विभागात नारळी पोर्णिमेनिमित्त सुटी असल्याने, तसेच ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन असल्याने ओपन टू ऑल या फेरीमध्ये प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांना ११ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ पर्यंत उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष हजर राहून प्रवेश घेण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

### सुंदरराव मोरे महाविद्यालयात

# अवयवदान जनजागृती कार्यक्रम

| पोलादपूर | वार्ताहर|

भावनिक आणि धार्मिक कारणांमुळे आजही बऱ्याच व्यक्ती अवयव दानासाठी तयार होत नाहीत आणि दुसरीकडे भारतात सातत्याने वाढणाऱ्या रुग्णसंख्येला विविध अवयवांची गरज भासते, असे अवयव वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे अनेक रुग्णांना स्वत:चे प्राण गमवावे लागतात यासाठी अधिकाधिक जनजागृती होणे आवश्यक असल्याचे मत डॉ. गुलाबराव सोनावणे यांनी व्यक्त केले.




शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने अवयवदान जागृती संदर्भात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रायगड जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलादपूर पंचायत समिती आरोग्य विभाग यांच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन अध्ययन विभागाचे कार्यक्रम अधिकारी व दक्षिण रायगड जिल्हा समन्वयक डॉ. नाथिराम राठोड यांनी केले.

आपल्या प्रमुख मार्गदर्शनपर मनोगतामध्ये पोलादपूर आपला दवाखाना वैद्यकीय अधिकारी डॉ. गुलाबराव सोनावणे यांनी विद्यार्थ्यांना अवयव दान ही संकल्पना तसेच अवयवदान कोणी करावे आणि त्यासाठी आवश्यक असणारी कार्यपध्दती याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

### महाराष्ट्र मराठी सामाजिक संघटना

# उपाध्यक्षपदी सुवर्णा जाधव यांची नियुक्ती

| माणगाव | वार्ताहर |

महाराष्ट्र मराठी सामाजिक संघ या सेवाभावी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी माणगाव येथील समाजसेविका सुवर्णा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र संघटना प्रमुख दिपक काळिंगण यांनी आपल्या सहीनिशी दिले आहे. सुवर्णा जाधव यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



माणगाव येथील समाजसेविका सुवर्णा जाधव या बहुजन समाजात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करीत असतात. त्यांना समाज कार्याची विशेष आवड आहे. माणगाव तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम त्या सातत्याने राबवित असतात. महिला सक्षमीकरणासाठी त्यांची विशेष अशी तळमळ नेहमीच राहिली आहे. महिलांच्या हाताला काम मिळून त्यातून मिळणाऱ्या चार पैशांतून त्यांच्या कुटुंबाला हातभार लागावा तसेच महिलांनाही आपल्या आवडी – निवडीप्रमाणे काही मौल्यवान वस्तू खरेदी करता याव्यात हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन सुवर्णा जाधव या महिलांच्या उन्नतीसाठी काम करीत असतात. शिवण क्लासचे वर्ग सुरु करून त्यांनी अनेक महिलांना रोजगाराची संधी निर्माण करून दिली आहे. याचबरोबर तरुणांना क्रीडा क्षेत्रात त्या नेहमीच आपल्या परीने मदत करून प्रोत्साहित करीत असतात.

## निवडक



### अलिबागेत आदिवासी दिन साजरा

**अलिबाग** : आदिवासी दिन उत्सव समिती अलिबाग व मुरुड तालुका तर्फे अलिबाग येथे जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पारंपरिक वेशभूषेत आदिवासी व ठाकूर समाज मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. लायन्स क्लब अलिबागच्यावतीने रिलिव्ह द हंगर उपक्रमाअंतर्गत क्लबचे डिस्ट्रिक्ट फर्स्ट व्हाइस गव्हर्नर प्रवीण सरनाईक, अलिबाग लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रदीप नाईक व क्षात्रैक्य समाज अध्यक्ष द्वारकानाथ नाईक यांच्या हस्ते खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी आदिवासी समाज अध्यक्ष महादेव मेंगल व कार्याध्यक्ष भगवान नाईक यांनी आदिवासी व ठाकुर समाजास लायन्स क्लब तर्फे नेहमीच मदतीचा हात मिळत असल्याने समाधान व्यक्त केले. हा कार्यक्रम केवळ खाऊ वाटपाचा नसून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून आपण सारे एकच हा संदेश देणारा ठरला, असे त्यांनी सांगितले. यावेळी लायन्स क्लब सचिव महेश कवळे, अविनाश राऊळ, दिपक पाटील, महेंद्र पाटील, भगवान मालपाणी, नितीन शेडगे, रोहन पाटील, रमेश धनावडे, पूनम धनावडे, मिलिंद मगर आदी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गॅरेजच्या वादातून जीवघेणा हल्ला

**पनवेल** : तालुक्यातील तळोजा गावात गॅरेज तोडल्याच्या रागातून हिंसाचाराची धक्कादायक घटना घडली आहे. यामध्ये धारदार चाकू, लोखंडी रॉड, लाकडी बांबू आणि दांडक्यांनी बेछूट हल्ला करण्यात आला. या घटनेत चार जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळलेल्या माहितीनुसार, मोटार दुरुस्ती गॅरेजवरील तक्रारीच्या वादातून हा हल्ला झाला. सय्यद परिवाराच्या तक्रारीनंतर सीडको अतिक्रमण विभागाने तीन वेळा गॅरेज तोडले होते. त्याचा राग मनात धरून आरोपींनी हल्ला केला. ही घटना घडली तेव्हा सय्यद कुटुंबातील काही युवक घरी होते. त्यावेळी रौफ रजाक पटेल (६०) याच्यासह अफनान पटेल, सफवान पटेल, नवमान मुनाफ पटेल आणि इतर आठ-दहा जणांनी सय्यद परिवारातील युवकांवर अचानक जीवघेणा हल्ला केला. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या नौफिल हानीफ सय्यद (४०) यांनाही मारहाण आणि धमकी देण्यात आली. सैफ हानीफ सय्यद (२४), सलमान सुफियान सय्यद (१९) आणि सफवान करीम तिदारे (२७) हे गंभीर जखमी झाले आहेत. तळोजा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून स्टीलच्या चाकूचे कव्हर जप्त केले आहे. मुख्य आरोपी रौफ पटेल याला अटक करण्यात आली असून इतर आरोपी फरार आहेत.

### बीअरच्या दुकानातील लाखोंचा ऐवज चोरून कामगार पसार

**पनवेल** : नवीन पनवेल येथील किशोर पाटील यांचे ओएनजीसी गेटच्या बाजूला आर्यन बिअर शॉपी आहे. त्यांच्या बियर शॉपीमध्ये हिरेश सुनील सुतार हा काम करतो. २०२४ मध्ये त्याने बियरच्या विक्रीमध्ये अडीच लाखांची अपरातफर केली होती. त्यावेळी त्याने अफरातफर केल्याचे मान्य देखील केले होते. त्याने अफरातफरीची रक्कम पगारातून कापून घेण्यास सांगितल्याने त्याला पुन्हा कामावर ठेवण्यात आले होते. दरम्यान, किशोर पाटील हे शॉपवर आले असता त्यांना दुकानातील माल कमी वाटल्याने त्यांनी हिरेशला शॉपवर येण्यास सांगितले होते. काही वेळाने त्याला पुन्हा फोन केला असता त्याचा फोन बंद लागला. त्याच्या वडिलांना फोन करून हिरेशला लवकर शॉपवर पाठवा, असे सांगितले. मात्र, तो आलाच नाही. त्यांनी दुकानातील बियरचे पॅक बॉक्स चेक केले असता ते बॉक्स रिकामे होते. हिरेशने रिकामे बॉक्स पॅक करून ठेवले होते. शॉपमध्ये रजिस्टर व माल चेक करून पाहिले असता जवळपास ७ लाख १८ हजार रुपयांचा माल दिसून आला नाही. तसेच, ओपनिंगची ३० हजार रुपयांची रोख रक्कम देखील चोरून नेल्याचे लक्षात येताच हिरेश सुतार याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### एटीएम कार्ड बदलून फसवणूक

**पनवेल** : खारघर सेक्टर १५ मधील नामदेव पाटील हे एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी एक अनोळखी व्यक्ती त्यांच्या जवळ येऊन उभा राहिला. त्याने काका लवकर पैसे काढा, असे बोलून त्यांचे पैसे निघत नसल्याने त्यांना बॅलन्स चेक करण्यास सांगितले. त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदली केली आणि तो निघून गेला. त्यानंतर नामदेव पाटील यांनी एटीएममधून पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता पैसे निघाले नाही. त्यामुळे त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्याला बोलावले. त्याने एटीएम कार्ड नामदेव यांचे नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर त्यांच्या मुलाचा फोन आला आणि तुमच्या अकाउंट मधून २५ हजार रुपये कोणीतरी काढल्याचे सांगितले. त्यावेळी आपली फसवणूक केल्याचे लक्षात येताच त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वीज समस्यांनी कर्जतकर बेजार

## ● समस्या न सोडविल्यास आंदोलन छेडू ● संघर्ष समितीकडून महाविरणला अल्टिमेटम

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील वीज समस्यांनी ग्राहक बेजार झाले आहेत. ग्राहकांच्या वीज समस्यांबाबत कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समिती आक्रमक झाली आहे. वीज समस्या सोडविण्यासाठी महावितरण कंपनीला अल्टिमेटम देण्यात आला असून वीज ग्राहक संघर्ष समितीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. दरम्यान, वीज ग्राहकांची कोणतीही परवानगी न घेता स्मार्ट मीटर लावल्यास त्या ठेकेदारावर गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.**



कर्जत तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, हॉटेल व्यवसायिक, ऑनलाइन काम करणारे युवक, उद्योजक, फार्म हाऊस व्यावसायिक इत्यादींचे मोठे नुकसान होत आहे. विजेवरील उपकरणे खराब होत असून आर्थिक नुकसानही मोठ्या प्रमाणात होत आहे. याबाबत शनिवारी (दि.९) कर्जत महावितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांसोबत वीज ग्राहक संघर्ष समितीची बैठक पार पडली. या बैठकीत गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्व विजेची कामे तात्काळ पूर्ण करावीत, तसेच उत्सव काळात २४ तास अखंड वीज पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, स्मार्ट मीटर ग्राहकांच्या सहमतीशिवाय बसवू नयेत. प्रलंबित विज समस्यांचे तातडीने निराकरण करावे. लाईट बिल वेळेवर देण्यात यावे. ग्राहकांच्या तक्रारी ऐकून घेऊन तात्काळ उपाययोजना कराव्यात. कर्जत शहराला २४ तास सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी एक्स्प्रेस फिडर सुरु करणे. तसेच, याकामी पोल टाकताना योग्य ती खबरदारी घ्यावी, इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहेत. जर असे झाले नाही तर तीव्र आंदोलन छेडू, असा इशाराही संघर्ष समीती कडून करण्यात आला आहे.

### महावितरणकडून सकारात्मक प्रतिसाद

**या बैठकीत चंद्रकांत केंद्रे यांनी निवेदनाची तातडीने दखल घेत, ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसवले जाणार नाही, असे आश्वासन दिले. यावेळी ठेकेदारास फोन करून संबंधित सूचना दिल्या. तसेच, चौक इनकमर ८ दिवसांत सुरू करण्यात येईल. कर्जत शहराला सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी एक्स्प्रेस फीडरचे काम त्वरीत पूर्ण करण्यात येईल, असेही सांगण्यात आले. त्याचबरोबर गणपती उत्सवात २४ तास अखंड वीज पुरवठा होईल, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले.**

# चौल-सोंडेपारातील बंद घरात चोरी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौल-सोंडेपार गावातील वातावरणाला २९ जुलैच्या सायंकाळी एका धक्कादायक घरफोडीने हादरा दिला आहे. आरती अनंत काटवी यांच्या ताब्यातील हे घर असून ते अज्ञात चोरट्याच्या निशाण्यावर होते. घर बंद असल्याचा फायदा घेत चोरट्याने पाळत ठेवत योग्य संधी साधली आणि घरात प्रवेश केला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रेवदंडा पोलिसांच्या माहितीनुसार, चोरट्याने सर्वप्रथम किचनची लाकडी झडप उघडली. खिडकीवरील लोखंडी गज जबरदस्तीने वाकवून आत शिरल्यानंतर त्याने घराचा मागचा दरवाजा उघडला. घराच्या आतील खोलीत मोठ्या आकाराची जुनी, पुरातन न वापरती तांबे व पितळेची भांडी चोरून नेण्यात आली. या घटनेनंतर आरती काटवी यांनी तात्काळ रेवदंडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी हा प्रकार अदखलपात्र असल्याने आरती यांना प्रभारी न्यायालयातून दाद मागण्याची सूचना दिली आहे. पुढील चौकशी सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार लोहार करत आहेत.



या घटनेमुळे बंद घरे, विशेषतः गावातील जुन्या वास्तू आणि पुरातन वस्तूंवर चोरट्यांची नजर असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. स्थानिक ग्रामस्थांनी रात्रीची गस्त वाढविणे आणि पोलिसांच्या गस्त पथकांनी वारंवार हजेरी लावणे याची मागणी केली आहे. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. अनेक गंभीर प्रकरणांवर तात्काळ कारवाई करून त्यांनी कठोर पोलिसिंगची छाप निर्माण केली आहे. मात्र, चौलसारख्या गावांतील अशा चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी अजूनही अधिक काटेकोर उपाययोजना राबवण्याची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.



### झाडाला राख्या बांधत अनोखे रक्षाबंधन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील नेणवलीच्या जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी यंदाचा रक्षाबंधन सण अत्यंत अनोख्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केला. नेहमीप्रमाणे हाताने तयार केलेल्या राख्या एकमेकांना बांधण्याऐवजी, मुलांनी वृक्षांना बांधून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश दिला. या उपक्रमात शाळेतील सर्व मुलांनी उत्साहाने भाग घेतला. मुलांनी टाकाऊ वस्तूंपासून आणि नैसर्गिक साहित्यापासून राख्या तयार केल्या. शाळेच्या परिसरात लावलेल्या झाडांना या राख्या बांधून वृक्ष जोपासण्याचा वसा घेतला.

### मुरूडमध्ये राखी कार्यशाळेचे आयोजन

**मुरुड-जंजिरा** : तालुक्यातील चोरढे मराठी शाळेत सेवांगण फाऊंडेशनने राखी तयार करण्याच्या कार्यशाळेचे आयोजन केले. या मोठ्या पटाच्या शाळेतील मुलामुलींना राखी तयार करण्यासाठी लागणारे साहित्य फाऊंडेशनने स्वखर्चाने आणून, प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बाजारात विकत मिळणाऱ्या राख्या, त्यासाठी लागणारी सामग्री, खरेदी किंमत याचा तौलनिक तक्ता सादर करून विद्यार्थ्यांपुढे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.



● माणगावमधील इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थीनींनी पोलीसांना राखी बांधत रक्षाबंधन सण साजरा केला.



● २४ तास आपल्या कामात व्यस्त असणाऱ्या पोलीसांना पीएनपी शाळेतील विद्यार्थिनींनी पोलीस ठाण्यात जाऊन राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. (छायाचित्रः समीर मालोदे)

# कुत्र्यांपासून संरक्षणाची निवेदनाद्वारे मागणी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

नागरिकांना चोरापासून नव्हे तर कुत्र्यांपासून संरक्षण द्या, अशी म्हणायची वेळ आली आहे. याबाबत भिसेगावातील महिलांनी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन दिले आहे.

कर्जत-भिसेगाव परिसरातील नागरिक मोकाट कुत्र्यांच्या सुळसुळाटाने त्रस्त झाले आहेत. रात्रभर भुंकणे आणि दिवसा वाहनधारकांच्या मागे धावणे, पादचाऱ्यांवर गुरगुरणे या त्यांच्या दिनक्रमामुळे नागरिक हतबल झाले आहेत. त्यामुळे नगरपरिषद प्रशासन आणि पशुवैद्यकीय विभागाने या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी भिसेगावातील महिलांनी नगरपरिषद आणि पोलीस ठाण्यात जाऊन कार्यालयीन अधिक्षक रविंद्र लाड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. जर वेळेत बंदोबस्त केला नाही तर १५ ऑगस्ट रोजी उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा देखील नारीशक्ती संघटनेच्यावतीने करण्यात आला आहे. यावेळी ज्योती जाधव, सविता गायकर, नूतन शेख, संगीता कडू, पल्लवी ठाकरे, छाया सारंग, चांदणी पिंगळे, रुपाली जोशी, हेमांगी पवार, ममता पवार, स्नेहल ठाकूर, सुनीता खाडे, चित्रा सोनावणे, आशा वाल्मिकी, मनीषा हजारे, रंजना हजारे, ज्योती लोधी, सारिका मोरे व हिराबाई जाडकर आदी उपस्थित होत्या.




### नारळफोडीची परंपरा श्रीवर्धनमध्ये कायम

**श्रीवर्धन** : येथे नारळी पौर्णिमेनिमित्त नारळफोडी खेळाची परंपरा आजही कायम आहे. यावेळी हौशी खेळाडू आपल्या खेळाची हौस समुद्र किनाऱ्यावर भागवताना दिसले. नारळी पोर्णिमेनिमित्त शुक्रवारी (दि.८) नारळाचे चोड व शेंडी काढून गोटा केलेला नारळ हातात घेत स्पर्धक नारळ घेऊन मैदानात नारळफोडी खेळासाठी उतरले. दोन खेळाडूंमध्ये वीस फुटांचे अंतर ठेवले जात असून समोरील स्पर्धकाकडे जमिनीवरून सरपटत सोडलेला नारळ समोरील स्पर्धक हातातील नारळाने फोडतो. खेळात फुटलेले नारळ प्रसाद रुपी देण्यात येतो.

### आदिवासी दिनानिमित्त रॅलीचे आयोजन



**। महाड । प्रतिनिधी ।**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त महाड तालुक्यातील आदिवासी बांधवांनी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीत महाडच्या प्रतिष्टीत नागरीकांनी सहभाग घेत आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या. गेली अनेक वर्षे महाड तालुक्यात आदिवासी समाजातील बांधव एकत्र येत पारंपरिक वेशभूषा व नाच सादर करत रॅली द्वारे आनंद उत्सव साजरा करतात. तालुक्यातील आदिवासी समाज तालुका अध्यक्ष रामदास जाधव व किसन पाटील यांच्यासह हजारो आदिवासी बांधवांनी महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत रॅलीला सुरवात करण्यात आली.

## आश्रम शाळेत भरला तिबोटी खंड्याचा वर्ग | आदिवासी मुला-मुलींना प्रचंड कुतूहल

# रायगडचा जिल्हा पक्षी चिमुकल्यांसोबत शाळेत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

माणगावमधील वनवासी कल्याण आश्रम शाळेत बुधवारी (दि.६) पिटुकला पण अतिशय रंगीबेरंगी सुंदर असा एक पक्षी आला. त्यामुळे शाळेच्या आवारात मुला-मुलींची हा पक्षी पाहण्यासाठी एकच गर्दी झाली होती. याबाबतची माहिती मिळताच माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांना माहिती या आश्रम शाळेला भेट दिली. या पक्षाची पाहणी करताच त्यांनी, हा पक्षी आपला जिल्हा पक्षी तिबोटी खंड्याचे पिल्लू असल्याचे सांगितले.



माणगावातील वनवासी आश्रम शाळेतील इयत्ता सातवी शिकत अलेल्या देवानंद नावाच्या विद्यार्थ्याने बुधवारी शाळेच्या व्हरांड्यात पडलेल्या रंगीबेरंगी पक्षाला सुरक्षितरित्या हातावर घेऊन शाळेचे अधिक्षक विलास देगावकर यांच्याकडे आणला. त्यानंतर शाळेच्या आवारातच त्या पक्ष्याला त्वरित सोडण्यात आले. परंतु, दुसऱ्या दिवशी गुरूवारी (दि.७) हा पक्षी पुन्हा शाळेत आल्याने विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांमध्येसुद्धा मोठ्या कुतूहलाचा विषय निर्माण झाला. देगावकर यांनी, आमच्या शाळेत शिकण्यासाठी नवीन पिटुकला विद्यार्थी आला आहे, त्याचा आज दुसरा दिवस, असे संबोधत माणगंवचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांना सांगितले.

त्यानंरत कुवेसकर यांनी वनवासी कल्याण आश्रम शाळेस त्वरित भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी सुरक्षितरित्या एका खोक्यामध्ये ठेवलेल्या पक्ष्याला बाहेर काढत पाहणी केली असता हा पक्षी तिबोटी खंड्याचे अपरिपक्व पिल्लू असल्याचे सांगितले. तसेच, हे पिल्लू साधारणतः १५-२० दिवसांपूर्वी घरट्यातून उडून बाहेर पडले असावे. त्याच्या चोचीच्या बदलत्या रंगावरून असा अंदाज वर्तवल्याचे सांबत त्यांनी जिल्हा पक्षी असलेल्या तिबोटी खंड्याबद्दलची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांसह शिक्षकांना दिली. त्यांनतर शाळेच्या परिसरात या तिबोटी खंड्याच्या पिल्लाला मोकळे सोडण्यात आले.

### पावसाळी दिवसांत विणीचा हंगाम

पावसाळी दिवसांत तिबोटी खंड्या या पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो. दक्षिणेकडून हे पक्षी मुख्यतः स्थलांतर करून मोठ्या प्रमाणात कोकणात तसेच अगदी मुंबई ते गुजरातच्या सीमेपर्यंत उपलब्ध नैसर्गिक आवासांमध्ये येतात. वनवासी कल्याण आश्रम शाळेच्या आजूबाजूला त्याला मुबलक असा नैसर्गिक अधिवास उपलब्ध आहे. त्यामुळे तो या ठिकाणी आला असावा, अशी माहिती माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी दिली.

### विद्यार्थ्यांमध्ये उत्साह

आश्रमशाळेत येणाऱ्या विध्यार्थ्यांना जंगल परिसराची चांगलीच ओळख असते. त्यामुळे आपल्या शाळेत पाहुणा आलेल्या या पक्ष्याबद्दल विद्यार्थ्यांची प्रचंड उत्सुकता दिसून येत होती. शंतनु कुवेसकर यांच्या मार्फत विद्यार्थ्यांनीच हा पक्षी राहण्यायोग्य अशा शाळेजवळील नैसर्गिक अधिवासात जाऊन मोकळे सोडण्यात आला. तिबोटी खंड्याचे हे पिल्लू भरारी घेत स्वैरपणे उडून गेले. त्यावेळी विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.

### महाविद्यालयच्या जागेचे भूमिपूजन

**चिरनेर** : उरणच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील महाविद्यालयीन शिक्षण शहरात न जाता ते आपल्या नजीकच्या चिरनेर सारख्या गावात घेता यावे. यासाठी खारपाटील बंधूंनी या महाविद्यालयाचे हाती घेतलेले कार्य अतिशय चांगले आहे. उद्योगपती पी.पी. खारपाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (दि.८) पार पडला. या निमित्ताने पी.पी. खारपाटील यांचा जीवन प्रवास उलगडणाऱ्या 'पांडुरंग वारी' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# महसूल सप्ताह यशस्वी

## • उरणचे तहसिलदार उद्धव कदम याचे प्रतिपादन



। उरण । प्रतिनिधी ।

उरण महसूल विभागाने एक ते सात ऑगस्टपर्यंत राबविलेल्या विशेष महसूल सप्ताहातनागरिकांना विविध प्रकारचे ३५१ दाखले तर शासकीय जागेवर केलेल्या २० अतिक्रमित जमिनींची पाहाणी केली. एक अवैध पार्किंग निष्कासित करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदारांनी दिली.

महसूल विभागाने राज्यभरात विशेष महसुली सप्ताह साजरा करण्याचे आदेश दिले होते. उरण तालुक्यातील शेतकरी, नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या महसूल सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन उरण चे तहसिलदार उद्धव कदम ; यांनी केले होते. आवाहनानंतर आठवडाभर आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहाला शेतकरी, नागरिकांनीही चांगला प्रतिसाद दिला आहे.

या सप्ताहाच्या शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत गुणवंत कोतवाल, शिपाई, तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, नायब तहसीलदार, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी आदी ४५ जणांशी सुसंवाद साधून प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. दुसऱ्या दिवशी कोप्रोली, जासई महसुली मंडळ विभागातील शासकीय भूखंडावरील २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ पात्र असलेल्या २० अतिक्रमणांची पाहणी करण्यात आली. तिसऱ्या दिवशी कोप्रोली महसुली मंडळाच्या विभागातील पिरकोन- पानंद दरम्यानचा अतिक्रमित रस्ता कारवाई करुन मोकळा करण्यात आला. तसेच पिरकोन- पानंद रस्ता, पुनाडे व विंधणे आदिवासी वाडीवरील दुतर्फा रस्त्यावर सावली देणारी ३८ झाडे लावण्यात आली. ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. या अभियानात उत्पन्न, जातीचे, रहिवासी, ज्येष्ठ नागरिक आदी मिळून ३५१ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तर रेशनकार्ड नसलेल्या ९ नागरिकांना रेशनकार्डचे वाटप करण्यात आले. पाचव्या दिवशी डिबीटी योजनेअंतर्गत २९ लाभार्थ्यांची अधिकाऱ्यांनी घरी जाऊन भेट घेतली. त्यांची केवायसी करण्यासाठी कागदपत्रे जमा करण्यात आली.सहाव्या दिवशी जासई, पागोटे येथील शासकीय जागेवर अतिक्रमण करुन उभारण्यात आलेले एक भलेमोठे अवैध पार्किंग निष्कासित करण्यात आले.

सातव्या दिवशी विशेष महसूली सप्ताहाची सांगता करण्यात आली. यावेळी कर्मचारी, अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमधील समन्वय व सुसंवादामुळेच महसूल सप्ताहाला चांगला प्रतिसाद मिळाला.

## पोलिसांकडून संचलन



। रसायनी । प्रतिनिधी ।

गोपाळकाला,गणोशोत्सव सण काही दिवसांवर येऊन ठेपला असताना रसायनी परिसरातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन अधिकच सतर्क झाले आहे. नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासोबतच अनुचित प्रकारांना लगाम घालण्यासाठी रसायनी पोलिसांनी मोहोपाडा शहरातील मुख्य बाजारपेठ ते मोहोपाडा गाव तेथून नविन पोसरी बाजारपेठ ते मोहोपाडा पोलीस चौकी या रस्त्यांवर संचलन करण्यात आले. रसायनी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या नेतृत्वाखाली रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, प्रमोद हंबीर, अनुसया ढोणे, प्रकाश माळी यांच्यासह पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

## समूहगान स्पर्धेचे आयोजन

**पोलादपूरः** तालुक्यातील आकार प्रतिष्ठान या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थेमार्फत बुधवार (दि. २०) ऑगस्ट रोजी संस्थेच्या वर्धापन दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी साने गुरूजी विद्यालय, लोहारे येथे पोलादपूर तालुका मर्यादित शालेय विद्यार्थ्यांसाठी समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात घेण्यात येईल. प्राथमिक गटात राजिपच्या शाळा प्रत्येक केंद्रातून फक्त एक शाळा सहभागी होऊ शकते तर माध्यमिक गटात एका शाळेतील एक गट सहभागी होऊ शकतो असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे यांनी सांगितले.

## आदिवासी दिनानिमित्त बांधव एकवटले



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

आदिवासी कातकरी विकास मंडळातर्फे जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन विविध कार्यक्रमांनी करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून पोलादपूर शहरातील बाजारपेठेमधून भव्य रॅली काढून कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये २२ आदिवासी वाडयांतील महिला, बांधव व तरूणांची शिस्तबध्द रॅली पोहोचली. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा सत्कार समारंभ झाला. मार्गदर्शनाच्या कार्यक्रमानंतर आदिवासी तरूणी व तरूणांचे सांस्कृतिक कार्यक्रम व विविध गुणदर्शन सादर झाले.

यावेळी गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाला. संपूर्ण दिवसभर सुरू असलेल्या या कार्यक्रमास बिगरराजकीय स्वरूप होते. याप्रसंगी नायब तहसिलदार उभारे, पुरवठा अधिकारी आबा जगताप, मंडळअधिकारी मंगेश पवार व फुलचंद राठोड, श्रमजीवी जनता सहायक मंडळ साताराचे महाड व्यवस्थापक विठ्ठल कोळेकर व सातारा येथील संस्था सचिव अशोक पागे, मेघा कदम, विजया पाटेकर, दीपक साबळे, पांडुरंग वाघे, काशिनाथ पवार, चंद्रकांत निकम, संजय वाघमारे, शंकर पवार, विनायक वाघे, हंसा पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## राधाकृष्ण उत्सवास सुरूवात

। खरोशी । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील वढाव गावात ९ ऑगस्टपासून राधाकृष्ण उत्सवास प्रारंभ झाला असून, या उत्सवासाठी मुंबई, ठाणे, पुणे, कोकणासह महाराष्ट्राच्या कानाकोप-यातुन भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे .

उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे रोज रात्री भगवान गोपाळ कृष्णाला होणाऱ्या प्रदक्षिणा व रात्री कीर्तन, चाकरमान्यानी आतापासूनच हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. नारळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी वढाव गावातील राधाकृष्ण उत्सवास सुरूवात होते. नित्यनियमाने मंदिरात सकाळी काकड आरती, प्रवचन, हरीपाठ आणि विविध धार्मिक कार्यक्रम सतत आठ दिवस चालू असतात. दररोज रात्री गोपाळ कृष्णाला पाच प्रदक्षिणा घालतात. त्या प्रदक्षिणा पाहाण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. यावेळी जयराम, श्रीराम जयराम या नावाच्या जल्लोषाने येथील परीसर दुमदुमून जाते. या उत्सवास सतत आठ दिवस कीर्तन होत असून सप्ताहामध्ये कृष्ण जयंतीच्या दिवशी सकाळपासून वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम सतत सुरु असतात.

## इस्कॉन मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव प्रारंभ

। उरण । प्रतिनिधी ।

इस्कॉन खारघर श्री श्री राधा मदन मोहन जी मंदिर, महाराष्ट्राचे वैभव वैदिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र येथे यंदा श्रीकृष्ण जन्माष्टमीचा पंधरवडाभर चालणारा भव्य उत्सव सुरू झाला आहे. भक्तांसाठी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, मुख्य जन्माष्टमी उत्सव १६ ऑगस्ट रोजी साजरा होईल. त्या दिवशी मध्यरात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्णांचा महाअभिषेक होणार असल्याचे आयोजक समितीने सर्व भाविकांना या आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री.देवीदास दत्ता निरगुडा यांनी त्या मिळकतीचे मालक श्री.किसन गणपत पादीर यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे ओलमण, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १२ | ३ | ०.२४.०० | २.३१ |

तंद्गभूतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १०-०८-२०२५

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस,एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## आम्ही उलवेकर मित्र मंडळातर्फे शैक्षणिक साहित्य भेट



। उरण । प्रतिनिधी ।

आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळातर्फे जिल्हा परिषद शाळा गव्हाण आणि कोपर ह्या शाळामध्ये मंडळाचे संस्थापक सचिन राजे येरुणकर यांच्या वतीने स्पीकर, एमलीफायर मशीन, प्रिंटर आणि माईक देण्यात आले. त्यावेळी विजय घरत, माई ताई भोईर, सुहास देशमुख, संदीप पाटील, रोहन खंडू, साई पैकडे, कीर्ती फाटक, रचना येरुणकर, सरिता साळवे, सुप्रिया सावंत, नम्रता मुरकर, संध्या पाटील, सोनाली ठाकूर, सविता दवे आदी मान्यवर उपस्थित होते. आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळाच्या माध्यमातून नेहमी विविध सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम राबविले जातात. या वेगवेगळ्या उपक्रमातून वेगवेगळ्या विषयावर जनजागृती सुद्धा केली जाते. त्यामुळे आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळने आयोजित केलेल्या सर्वच उपकमांना जनतेचा नेहमीच उत्तम प्रतिसाद मिळत असतो.

## डॉ. ए. आर. पाटील यांची प्राचार्यपदी नियुक्ती

। रसायनी । प्रतिनिधी ।



डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाशिवली येथे राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक डॉ.अनिल रामराव पाटील पाटील यांची प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली. डॉ. अनिल पाटील हे डॉ.पारनेरकर महाराज कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या ३० वर्षापासून जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करीत आहेत, या अध्यापनाच्या कालावधीत आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी योग्य शैक्षणिक मार्गदर्शन करून विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग भरारी घेण्यासाठी प्रवृत्त केले आहे. यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये सुद्धा त्यांचे विद्यार्थी आज उच्च पदावर अधिकारी म्हणून तर काही डॉक्टरेट पदवी प्राप्त करून इंजीनियरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे गणेगाव चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड येथिल मिळकती**

| अनु क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | ७२/१० | ०-७२-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण ०-७४-०० | ०-५३ |
| २. | ७२/१२/अ/२ | ०-२४-००<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण ०-२५-०० | ०-१९ |

सदर मिळकतींबाबत कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, वारस हक्क, पोटगी, ताबा, वहिवाट, हवाला, मृत्युपत्र, साठेकरार, खरेदीखत, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५(पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतींमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतींचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
तारीख : १० ऑगस्ट २०२५.

सही
**ॲड. तारा रमेश देशमुख.**
रा.धापया मंदिर रोड कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा. ९३७२४२७८९०/७२७६६०२३२५

### PUBLIC NOTICE

**TAKE NOTICE THAT** the owners herein, i.e. **1) Shri. Madhukant R. Agrawal & 2) Shri. Jayesh B. Shah** intend to sell, and my client intends to purchase the piece and parcel of agricultural and non-agricultural land described more particularly in the Schedule of the Property hereto below, free from all encumbrances.

Any person having a claim or right in respect of the said property by way of inheritance, share, sale, memorandum of understanding, agreement for sale, sale deed, power of attorney, mortgage, lease, lien, license, gift, possession, easement, easementary right of road, or encumbrance howsoever is hereby required to notify the undersigned **within 14 days** from the date of publication of this notice of such claim, if any, with certified copies of all supporting documents. Failing which, the transaction shall be completed without reference to such claim, and the claims, if any, of such person shall be treated as waived and shall not bind our clients.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

**I)** Agricultural lands at Revenue Village - Dhamni, Taluka - Khalapur, District-Raigad.

| Sr. No. | Gat/Hissa No. | Class | Area Hectares-Are | Assessment Rs. Paise |
|---|---|---|---|---|
| 1. | 48/1/B | Class-I | 0-26-50 | 3=00 |
| 2. | 48/4/A | Class-I | 0-31-00 | 0=90 |

**ii)** Non-agricultural lands at Revenue Village-Dhamni, Taluka-Khalapur, and District-Raigad.

| Sr. No. | Gat/Hissa No. | Class | Area Ares-Sq.Mtrs., | Assessment Rs. Paise |
|---|---|---|---|---|
| 1. | 48/4/B | Class-I | 0-20-20 | 202=00 |
| 2. | 48/5/B | Class-I | 26-00-00 | 260=00 |

**iii)** Non-agricultural lands at Revenue Village-Dharavi, Taluka-Khalapur, District-Raigad.

| Sr. No. | Gat/Hissa No. | Class | Area Ares-Sq.Mtrs., | Assessment Rs. Paise |
|---|---|---|---|---|
| 1. | 18/1 | Class-I | 85-00-00 | 850=00 |
| 2. | 18/2/B | Class-I | 05-00-00 | 50=00 |

**Date : 10.08.2025**
**Place : Panvel**

Sd/-
**SHRI. JAGDISH N. URANKAR** (Advocate, High Court)
101, Aditya Pradnya Society, Near Gokhale Hall, Panvel,
Pin Code : 410206, Taluka-Panvel, District-Raigad.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आंबिवली त. कोतलखलाटी, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ९/५/अ | एकूण क्षेत्र ०-२९-१० हे.आर. | २.८२ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४(चार) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- १०/०८/२०२५ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
ठिकाण :- पनवेल पत्ताः-शॉप नं.२३, प्लॉट नं.५१,
कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. २०९/२०२५

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्रीम.योगीता चंद्रकांत शिरगावकर
वय ५० वर्षे, धंदा : गृहिणी,
रा.वडगांव कोंड, अर्जदार
ता.माणगांव, जि.रायगड

**विरूद्ध**

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव,
ता.माणगांव, जि.रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्रीम.योगीता चंद्रकांत शिरगावकर यांची आई कै.जनाबाई लक्ष्मण गावडे उर्फ सिताबाई लक्ष्मण गावडे ही दि.०१/०३/२०२३ रोजी मौजे वडगांव कोंड, ता.माणगांव, जि.रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. तिची मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि.०४/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आई कै.जनाबाई लक्ष्मण गावडे उर्फ सिताबाई लक्ष्मण गावडे ही दि.०१/०३/२०२३ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरीच जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम.योगीता चंद्रकांत शिरगावकर यांची आई कै.जनाबाई लक्ष्मण गावडे उर्फ सिताबाई लक्ष्मण गावडे ही दि.०१/०३/२०२३ रोजी मौजे वडगांव कोंड, ता.माणगांव, जि.रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव सही /-
ता.: ०८/०८/२०२५ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**कॉग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, अलिबाग,**
**पो.ता.अलिबाग जि.रायगड. पिन कोड : ४०२२०१**
**Email ID : aresalibag@gmail.com**

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग जि.रायगड यांचे समोर

**अर्ज क्रमांक :-९२/२०२५ जा.क्र.४५३**

दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसा.लि.अलिबाग तर्फे
सहा.व्यवस्थापिका सौ.उज्वला राजेंद्र पाटील अर्जदार
पत्ताः पाटील नाका, अलिबाग, नगरपालिकेसमोर
कार्यरत पत्ता:पाटील नाका, अलिबाग

**विरुद्ध**

१) श्री.अविनाश कोंडिबा वाघमारे
पत्ता :-नागोठणे रोड, साईमंदिराजवळ आंबेपुर-पेझारी
पो.पोयनाड ता.अलिबाग जि.रायगड ४०२१०८
२) श्री.भुषण शंकर पाटील प्रतिवादी
पत्ता :- घर नं.५२, कुलस्वामी मंदिराजवळ
पेझारी पो.पोयनाड ता.अलिबाग जि.रायगड ४०२१०८
३) श्री.निलेश हरिश्चंद्र सावर्डेकर
पत्ता :-घर नं.४०७, मराठी शाळेजवळ, बांधण
पो.पोयनाड ता.अलिबाग जि.रायगड ४०२१०८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु.४३,१३५/- साठीचा अर्ज.**

ज्याअर्थी दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसा.लि.अलिबाग तर्फे वसुली अधिकारी यांनी दिनांक ०९/०७/२०२५ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे. आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम ४३,१३५/- (अक्षरी रुपये त्रेचाळीस हजार एकशे पस्तीस रुपये मात्र) चे वसुली प्रमाण पत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादींना दिनांक ०९/०७/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. प्रतिवादी क्रमांक १ यांना नोटीस बजावली गेली नाही व ती दिलेल्या पत्त्यावर सदर मालकाचा तपास लागत नाही, असा शेरा मारुन परत आली आहे. प्रतिवादी क्रमांक १ यांना नोटीस बजाविली गेली नाही.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २२/०८/२०२५ रोजी दिवसाचे दुपारी १२.३० वाजता सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, कॉग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, अलिबाग, पो.ता. अलिबाग जि.रायगड पिन कोड-४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाचे आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरुन, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०५/०८/२०२५

सही/-
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ अलिबाग मधील फिजिओथेरपी क्लिनिकसाठी पुरुष व महिला मदतनीस पाहिजेत पगार + कमीशन १०,०००/- ते १५०००/- पर्यंत मिळेल. वेलनेस फिजिओथेरपी क्लिनिक ९२२६७६६१२९.

■ 'जन्नावार हॉस्पिटल' बायपास रोड चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509


■ आमच्या येथे J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४४९२५१६६

■ सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/ सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिहू (नागोठणा-पोयनाड)रायगड ७५०७१६६०१५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**


१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## संत एकनाथ महाराज बोधकथा



निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म पैठण क्षेत्र एकनाथ महाराजांच्या काळातील पैठण येथे एक हरिभक्त राहत होते. त्यांचे नाव कृष्ण दयार्नव. त्यांच्या देवघरात अनेक हातांची एक अति देखणी कृष्णमूर्ती होती. ती मूर्ती त्यांच्याकडे आपोआप हवेतून आली, अशी आख्यायिका आहे. त्यांना कुष्ठरोग झाला होता. सर्वांगातून रक्त आणि पू वाहत होते. जीव नकोसा झाला. लोकांना तोंड दाखवायची लाज वाटू लागली. एक दिवस ते संत एकनाथ महाराजांना भेटले. आणि आपली करूण कहानी सांगितली. श्री एकनाथ महाराजांचे हृदय कळवळले. त्यांनी त्यांना भागवताच्या दशम स्कंदावर मराठी टीका करण्याची आज्ञा दिली. कृष्ण दयार्नव कृष्ण भक्त होते. त्यांनी कठोर व्रताचरण करून गोदावरी तीरी टीका लिहिण्यास सुरुवात केली. दिवसेंदिवस त्यांचा रोग वाढत होता आणि लिखाण देखील वाढत होते. श्री एकनाथ महाराजांच्या शब्दावर नितांत निष्ठा आणि व्रता चरणाच्या ठिकाणी दुर्दम्य इच्छाशक्ती आणि सद्गुरूंच्या चरणी शरणागती यामुळे ते खचले नाहीत आणि कंटाळले देखील नाहीत. कर्तव्य कठोरतेने त्यांचे ग्रंथ लिखाण चालू होते. त्यांची ग्रंथ टीका काम समाप्त झाले. ग्रंथ समाप्त झाला त्यावेळी सूर्य डोक्यावर आला होता. अनेक महिने भगवंताच्या लीला वर्णनात घालवले, आता पुढे काय? त्यांना रडू कोसळले. त्यांच्या शरीराच्या वेदनांचे त्यांना काही वाटत नव्हते. भगवंताची लीला गाण्यात रंगलेले मन आज रिकामे झाले होते. तसेच, ते मध्यान स्नानासाठी गोदावरीच्या पवित्र पाण्यात उतरले. त्यांनी बुडी मारली आणि ते पाण्याबाहेर आले. त्यांचे सर्वांग रोगमुक्त झाले होते.

### सद्‌गुरू स्वामी बोध

भगवंतावरील निष्ठा काय करू शकते हे बोधकथे वरून कळते. प्रापंचिक माणसाला व्यवहार सोडता येईल का? संसारिक माणसाला अशी भक्ती करता येईल का? व्यवहारात सर्व जगाशी तोंड द्यावे लागते. परमेश्वराची एकांकिका भक्ती व्यवहाराच्या वेळी देखील शक्य आहे. भक्ती हे काही कर्म नाही. तो भाव आहे. भगवंताच्या कर्तृत्वाबद्दल अत्यंत आदर आणि खात्री असायला हवी. आपल्याजवळ पुण्याचा साठा असेल तर श्रीहरीचा वेध लागेल. श्रीहरीच्या आवडी शिवाय आपणास हरी भेटणे शक्य नाही. श्रीहरीचे मोठेपण एकदा समजले की त्यासाठी काय करायला पाहिजे हे देखील समजेल.

# सरसगडावरील अपघात चिंतेचा विषय

## • खबरदारी घेण्याचे आवाहन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पालीतील अलौकिक निसर्गसौंदर्याने नटलेला सरसगड किल्ला हा गडप्रेमी, ट्रेकर्स व निसर्गप्रेमी यांना नेहमीच आकर्षित करतो. परंतु, सरसगडावर वारंवार होणारे अपघात चिंतेचा विषय बनला आहे. त्यामुळे प्रशासन व ट्रेकर्सकडून खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सुधागड तालुक्यातील पाली येथील सरसगड किल्ला पावसाळ्यात ट्रेकर्सचे आकर्षण बनत आहे. हा किल्ली अत्यंत उभ्या चढाईचा असल्याने पावसाळ्यात कोणतीही खबरदारी न घेता या किल्ल्यावर जाणे अतिशय धोकादायक बनते. पावसाळ्यात सरसगड किल्ल्यावरून आतापर्यंत अनेक ट्रेकर्स व दुर्गप्रेमी पडल्याच्या घटना घडल्या आहेत. अशातच



### पावसाळ्यात धोकादायक

सरसगड किल्ला पावसाळ्यात निसरडा होतो. किल्ल्यावर जाण्यासाठी असलेल्या पायऱ्या या चिकट होतात. त्यावर शेवाळ देखील चढते. त्यामुळे तेथून चढताना व उतरताना अनेक वेळा पाय घसरतो. याशिवाय सरसगडावर चढताना तीव्र उतार आहे. पावसाळ्यात तिथे गवत येते. तसेच, तेथील जागा चिकट होते. त्यामुळे तेथे देखील पाय घसरण्याचा व तोल जाण्याचा धोका आहे. किल्ल्याच्या वरच्या टप्प्यावर देखील चढताना असलेल्या छोट्या पायऱ्या चिकट होतात आणि तेथून जाताना वाट धोकादायक होते.

शनिवारी (दि.२) सरसगडावरून एक तरुण पडून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती. रेस्क्यू टीम, पोलीस व स्थानिकांच्या अथक परिश्रम व मेहनतीने या जखमी तरुणाला खाली आणण्यात आले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत. चार वर्षांपूर्वी सरसगडावरून पडून एका तरुणाचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या घटना टाळण्यासाठी प्रशासनासह स्थानिक आणि प्रशिक्षित ट्रेकर्स यांनी सरसगडावर जाताना प्रत्येकाने योग्य खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

> “सरसगड किल्ल्यावर येणाऱ्यांनी आवश्यक सेफ्टी निकषांचे तंतोतंत पालन करावे. किल्ल्यावर कोणत्याही दुर्गम व धोकादायक ठिकाणी जाऊ नये. तसेच, किल्ल्यावर चढताना व उतरताना आवश्यक खबरदारी घ्यावी आणि शक्यतो पावसाळ्यात येणे टाळावे.
> **– हेमलता शेरेकर, पोलीस निरीक्षक, पाली**”

> “ऐतिहासिक महत्त्व असलेला सरसगड किल्ला हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. येथील निसर्ग सौंदर्य देखील विलोभनीय आहे. मात्र, पावसाळ्यात येथे येणारे दुर्गप्रेमी, पर्यटक आणि ट्रेकर्स यांनी खूप जास्त खबरदारी घेण्याची गरज आहे. आपला जीव धोक्यात येईल अशी कोणतीही कृती करू नये. तसेच, योग्य ती पूर्वतयारी व काळजी घेऊनच किल्ल्यावर जावे.
> **– आरिफ मनियार, प्रभारी नगराध्यक्ष, पाली**”

# कर्जत नगरपरिषदेकडून शववाहिनी कार्यान्वित

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात शासकीय रुग्णालय तसेच खासगी रुग्णालयातून मृतदेहाची वाहतूक करण्यासाठी एकही शववाहिनी उपलब्ध नव्हती. त्यामुळे कर्जत नगरपरिषद यांच्याकडून शववाहिनी खरेदी करण्यात आली असून ती नागरिकांच्या सेवेत दाखल करण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने मंजूर केलेल्या शव वाहिनीचे कर्जत नगर परिषदेकडे हस्तांतरण जिल्हा आरोग्य विभाग यांच्याकडून झाले आहे. त्यामुळे ही शववाहिनी शहरातील मृत व्यक्तीला त्यांच्या घरी पोहोचवण्याच्या सेवेत रुजू करण्यात आली आहे. पालिकेचे प्रशासक आणि मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी ही शववाहिका कर्जत नगरपरिषद येथे सेवेत रुजू केली. कर्जत शहरासाठी शववाहिनी उपलब्ध झाल्यामुळे परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीची व सुलभ वाहतूक सुविधा मिळणार आहे.



# महसूल सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

राज्याचे महसूल मंत्री यांच्या निर्देशानुसार रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे व मुरुड प्रांताधिकारी दुर्गा देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१ ते ७ ऑगस्ट या कालावधीत मुरुड तालुक्यात महसूल सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार आदेश डफळ यांनी शासन निर्णयातील सूचनेप्रमाणे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात महसुल दिन साजरा करणे, शासकीय जागेवरील सन २०११ पुर्वीपासून असलेल्या रहिवाशी अतिक्रमण धारकाच्या याद्या तयार करणे व अतिक्रमण जागांचे पट्टेवाटप करणेबाबतची कार्यवाही, पाणंद शिवरस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, तालुक्यातील मंडळ निहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर, विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी. न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून अनुदानाचे वाटप, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व धोरणांची अंमल बजावणी करून जनजागृती करण्यात आली. यावेळी मुरुड तालुक्यातील महसुल सप्ताहाला लोकप्रतिनिधी व नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# सुतारवाडी नाक्यावर गुरांचा ठिय्या

**। सुताराවाडी । प्रतिनिधी ।**

सुतारवाडी नाक्यावर रस्त्याच्या मधोमध मोकाट गुरं मोठ्या प्रमाणावर घोळक्यांनी उभी राहत असतात. त्यामुळे लहान मोठ्या वाहनांना मोठा त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. कोलाडपासून सुतारवाडी मार्गे पुणेकडे जाण्यासाठी ११० की.मी. अंतराचा रस्ता आहे, त्याचप्रमाणे विले भागड या परिसरात अनेक कंपन्या कार्यरत असल्यामुळे अवजड सामान घेऊन अनेक ट्रेलर या मार्गावरून सातत्याने धावत असतात. विले भागाड येथील कंपन्यांमध्ये कच्चामाल देऊन झाल्यानंतर परतीचा प्रवास करत असताना अनेक ट्रेलर चालक वेगाने वाहन चालवत असतात. अशावेळी रस्त्याच्या मधोमध विश्रांती घेत असलेल्या गुरांच्यामधून वाट काढणे कठीण होते. रात्रीच्या वेळी अशा उनाड गुरांना उडवून जाण्याचे प्रकार अनेक वेळा या परिसरात घडलेले आहेत. तसेच, रात्रीच्या वेळी या उनाड गुरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन टेम्पोत भरून त्यांना विक्रीसाठी नेण्याचे प्रकारे देखील घडत आहेत. तरीसुद्धा गुरांचे मालक याकडे दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.



# साप्ताहिक राशिभविष्य १० ते १६ ऑगस्ट २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### जीवनसाथीची साथ मिळेल

**मेष :** हा साप्ताह मेष राशीधारकांचे थोड्याशा मानसिक ताणातदेखील आरोग्य चांगले राहील. तुम्हाला पैश्याने जोडलेली काही समस्या येऊ शकते, ज्याला सुरळीत करण्यासाठी तुम्ही आपल्या पिता किंवा पितातुल्य कुणी माणसाकडून सल्ला घेऊ शकतात. आपल्या जीवनसाथी बरोबर चित्रपट पाहणे अथवा रात्रीचे जेवण करणे तुम्हाल शांतता, आराम मिळवून देईल आणि तुमचा मूड एकदम बहारदार राहील. तुम्हाला जीवनसाथीची साथ मिळाल्यामुळे दीर्घकाळ असणारी उदासवाणी एकाकी अवस्था संपून जाऊन वातावरण उत्साही बनेल. उद्योग व्यसायानिमित्त केलेला प्रवास दीर्घकाळापर्यंत फायदेशीर ठरू शकेल. तुमचे जोडीदार तुमची प्रशंसा करेल आणि पुन्हा एकदा तुमच्या प्रेमात पडेल. या कालावधीत तुम्हाला स्वतःची कुठली जुनी चूक कळेल आणि तुमचे मन उदास होऊ शकते. नैराश्याच्या जाणीवेला तुमच्यावर हावी होऊन देऊ नका. **महिलांना–** तुम्ही घरातून बाहेर खूप सकारात्मकतेने निघाल; परंतु, कुठल्या किमती वस्तूची चोरी होण्याने तुमचा मूड खराब होऊ शकतो. प्रत्येकाच्याच गरजा पुऱ्या करण्यासाठी तुम्ही प्रयत्न कराल. **शुभदिनांक–** ११,१२.

### हक्काचे यश मिळवता येईल

**वृषभ :** या साप्ताहात वृषभराशीसाठीचे ग्रहमान पाहता व्यापार–व्यवसायाच्या दृष्टीने अपेक्षित अशा क्षेत्रात जाण्यासाठी सोनेरी पायघड्या टाकणारा ठरेल. कष्टाचे प्रमाण वाढवावे लागले तरच फायद्याचे प्रमाणही वाढलेले असेल. स्वत:च्या हिमतीवर महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल. नोकरदार व्यक्तीने वरिष्ठांशी असलेले संबंध ताणले जाणार नाहीत याची काळजी घ्या. कोर्ट प्रकरणात शक्यतो कायदेशीर तडजोडीच्या मागे लागा. नियोजनबद्ध केलेल्या कामात हक्काचे यश मिळवता येईल. आर्थिक प्रकरणात सरशी होईल. व्यापार करणाऱ्या व्यक्तिंना साह्य न मिळाल्यामुळे त्रास सहन करावा लागेल. जो चिकाटी धरून राहील त्याचे नशीब पळफळनार आहे. कोणतीही कृती आताताईपणे न करता विचार पूर्वक करा. या आठवड्यात आपल्यावर जबाबदऱ्या येणार आहेत. या जबाबादऱ्या पार पाडताना आपला कस लागणार आहे. त्यामुळे आपल्यात असणारी सकारात्मक बाजू आपल्याला अडचणी सोडवण्यास मदत करतील. **महिलांना–** सरकारी क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तिंना मान सन्मान मिळणार आहे. कुटुंबात वाद विवादाचे कारण बनू नका. देव दर्शनाला जाण्याचा बेत आखला असेल तर ही इच्छा आता फलद्रूप होणार आहे. **शुभदिनांक–** १३, १४.

### खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा

**मिथुन :** मिथुनराशीसाठी आठडवड्याच्या शेवटी राजकारणात आपल्याला मानसन्मान मिळणार आहे. व्यापारात शेवटी शेवटी फायदा होणार आहे. मात्र, अशावेळी सत्याची बाजू घ्या, त्यामुळे यश प्राप्त होईल. कोणीतरी आपली कानउघडणी करण्याची गरज निर्माण होईल. तुमची ताकद तुमच्या विचारात आहे. आर्थिक लाभासाठी श्री सूक्त वाचने गरजेचे आहे. आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील. आपला राग एकदम बाहेर पडणारा असतो, त्या वाफ जाईपर्यंत थांबणे हितकारक असेल. त्यासाठी वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. **महिलांना–** व्यवहारात चढउतार संभवतात. तरीही हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. त्यामुळे काही झाले तरी आपले काम थांबवू नका. ५० पुढील व्यक्तिनि प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. एका बाजूने आपल्याला जोडीदाराची उत्तम साथ मिळणार आहे. **शुभदिनांक–** १५, १६.

### महत्वाच्या कामासाठी निवड होईल

**कर्क :** कर्कराशीधारकांची या सप्ताहात अनेक दिशांमध्ये अनेक बाजूंनी ओढाताण होईल. तुमचे धैर्य पाहून तुम्ही प्रेम जिंकाल. हा कालावधी तुम्ही सर्व नातेवाईकांपासून दूर होऊन आपल्या दिवसाला अश्या जागेत घालवणे पसंत कराल जिथे जाऊन तुम्हाला शांती प्राप्त होऊ शकेल. हे दिवस तुमच्या वैवाहिक आयुष्यातील एक उत्तम दिवस असतील. कुणाची साथ न मिळवता या कालावधीत तुम्ही भरपूर आनंद मिळवू शकाल. नोकरी धंद्यासाठी केलेला प्रवास यशस्वी होणार आहे. आपण केलेला लहान व्यवहार ही फायदा देणारा ठरणार आहे. व्यवसायात एखादे लक्ष प्राप्त होण्याचा संभव आहे. महत्वाच्या कामासाठी आपली निवड होऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली जाणार आहे. आपण मेहनतीने ती यशस्वी करू शकाल. प्रॉपर्टी बाबत व्यवहार होण्याचा संभव आहे. योग्य तो निर्णय घेण्यास हरकत नाही. **महिलांना–** प्रेम विवाहात बदल करण्यास बोलणी होऊ शकतात, आपण ताणून धरू नका. नाहीतर आपला तोटा होऊ शकतो. भावनेच्या भरात घेतलेला निर्णय चुकीचा असू शकतो. मनोरंजनासाठी जास्त खर्च करू नका. **शुभदिनांक–** ११,१२.

### विवाहइच्छुकांच्या आशा पल्लवित होतील

**सिंह :** सिंहराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता विवाहितांना घराच्या जबाबदाऱ्या पार पडताना नाकी नऊ येतील. थोडं संयम अधिक काळ धरणे आवश्यक राहील. इतर दिवस चिंतेत टाकणारे नसतील. तरी शेवट मात्र घरातील व्यक्तिनसाठी काळजी वाढवणारी ठरणार आहे. संतती बाबत ही चिंता असू शकते. आपल्या पूर्वजांना स्मरण करून काही दिवस त्यांच्यासाठी देणे आपल्यासाठी हितकारक असेल. पूर्वजांसाठी पितृपीडा स्तोत्र वाचने हितकारक आहे. ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांनी मात्र वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल. विवाहइच्छुकांच्या आशा–आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा. **महिलांना–** उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्चापासून लांब रहा. बचतींबाबत सजग राहा. जोडीदाराची साथ मिळेल. प्रवास संभवतो. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. **शुभदिनांक–** १०,१३.

### राजकीय क्षेत्रात जम बसवाल

**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पदवीधारकाने अभ्यास सुरू करावा. शेतीविषयक कामांना गती मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. गाईला पोळी घाला. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्यावं लागेल. घरात काही किमती वस्तूची खरेदी कराल. शुभ मनोरंजनामध्ये जागरण टाळणे हितावह आहे, ते आपणांस पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. प्रलोभने टाळा. **महिलांना–** आठवड्याच्या शेवटी महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. कामाची जबाबदारी वाढण्याची शक्यता राहील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. **शुभदिनांक–** ११,१६.

### संततीकडून खुश खबर मिळेल

**तुळ :** तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. आमावशेस प्रवास टाळावा. बाहेर पडताना तब्बेतीची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. थंड पदार्थ अजिबात घेऊ नये, त्या पासून लांब राहणे उत्तम ठरेल. संततीकडून खुश खबर मिळणार आहे. लांब फिरण्यास जाण्याचे नियोजन केले जाईल. तीर्थयात्रा करण्यास हरकत नाही. आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता असल्याने त्याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. आपल्या श्रमाला योग्य न्याय दिला जाईल. **महिलांना–** कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. सरकारी कर्मचारिवर्गाने नको त्या प्रलोभनात अडकू नका. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभदिनांक–** १०,१५.

### मुलांच्या कलागुणांना वाव मिळेल

**वृश्चिक :** वृश्चिक राशीसाठी या सप्ताहात बढती व बदलीबाबत विचार होऊन नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय व्यवहार करू नये. विशेषतः मुलांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. आमावशा भाग्यकारक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैरसमजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते कसोशीने पाळा. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. **महिलांना–** कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. प्रवासाचे योग संभवतात. **शुभ दिनांक –** ११, १४.

### नोकरदारांना बढती मिळेल

**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहात हाती घेतलेल्या कामांना मार्गी लावण्याचा प्रयत्न करा. घरगुती वातावरनात गोडवा येऊ शकेल. बाहेर फिरताना आपल्या किमिती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. सार्वपित्री आमावशा असताना दुपारी माशांना खाण्यास देणे भाग्यकारक आहे. सर्व मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना बढती मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. **महिलांना–**आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. **शुभ दिनांक–** १२,१३.

### यशाचा आलेख उंचावेल

**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. घरात वाद घालू नका. हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यानची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. प्रलोभन समोर आले तरीही नको त्या प्रलोभनात अडकून जाऊ नका. बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव मिळेल. व्यवसाईक लाभ घेऊ शकतील, प्रकृतीबाबत आपण चालढकलपणा न करता पथ्ये पाळा. नियमित व्यायाम करा, मसालेदार पदार्थ खाण्याचे व चहा टाळा. आपण अध्ययनातील क्षेत्रात कठोर परिश्रम व सातत्य अंमलात आणल्यास आपल्या यशाचा आलेख उंचावू शकाल. **महिलांना–** नोकरदार महिलानी वरिष्ठांशी मिळते–जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास उत्तम राहील. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. राजकीय व्यक्तिनचे राजकीय क्षेत्रात वर्चस्व राहू शकेल. **शुभ दिनांक–** १३,१४.

### शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल

**कुंभ :** या सप्ताहात काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची संधी मिळू शकेल. निर्णय मात्र विचारपूर्वक घ्यावा. आपण सर्व बाबतीत व कार्यक्षेत्रात शांततेने परिस्थिती हाताळल्यास आपणास अपेक्षित यश मिळू शकेल. शनिदेव किवा मारुतीला तेल वाहणे. आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. संतातीच्या प्रकृतीबाबत आपण अधिक दक्ष राहा. डॉक्टरचा सल्ला घ्या. आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. **महिलावर्ग–** हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. **शुभ दिनांक–** १४,१५.

### व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळ चागंला

**मीन :** या साप्ताहात मीन राशीसाठी व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळाचा अंदाज चांगला येईल. अनुकूलतेची चाहूल लागेल, पण ताटात वाढलेले पदार्थ प्रत्यक्षात तोंडात जाईपर्यंत काही होऊ शकते. नोकरदारांना मिळणारा थोरामोठ्यांचा विश्वास यातून चांगल्या गोष्टी घडवण्यासाठी सिद्ध व्हाल. मात्र, चारी बाजूंनी आवश्यक असणारी खबरदारी घेणे आवश्यक ठरेल. या सगळ्यातून वाढणारी जबाबदारी विसरू नका. कोठेही कायद्याचे उल्लंघन करू नका. वेळ व धन या दोन्ही बाबी आपल्या समाधान योग्य नसणार आहेत. आपला वेळ कसा जाईल हे समजून येणार नाही. हातात त्या प्रमाणात योग्य पैसा पडणार नाही. त्यामुळे आपल्या नियोजनाला महत्व येणार आहे. घर, जागेच्या कामा संबधी व्यवहार करू नका, उगाच कोर्ट कचेरी होईल. हे व्यवहार पुढे ढकलणे फायद्याचे राहतील. **महिलांना–** या काळात वादविवादापासून लांब राहा. मित्रमैत्रणींसोबत किरकोळ कुरबुरीना मोठ्या स्वरूपात वाढवू नका. अति तिखट बोलणे टाळा. खर्चावर निंबध ठेवा. खर्चात वाढ होणारा आहे. आपल्याला झेपतील इतकीच जबाबदारी स्वीकारा. **शुभदिनांक–** ११,१६.

# झुंडगिरीचा, गुन्हेगारांचा गौरव करणारे राजकारण!

**देवेंद्र फडणवीस किंवा भाजपा यांनी गुंडगिरी पोसली आहे, किंवा गुन्हेगार आणि गुंडाना हेच पक्षप्रवेश किंवा पाठिंबा देतात असे बोलणे एकांगीपणाचे होईल सर्व पक्ष थोड्याफार प्रमाणात अशा प्रकारे सत्ता कारणासाठी राजकारण करतांना दिसतात. स्वत: देवेंद्र फडणवीस आपली राजकीय प्रतिमा नेहमी चांगली ठेवूनच आहेत. त्यांनी आपल्या छबी काटेकोरपणे चांगली राहील याची व्यवस्था केली आहे.**




महाराष्ट्राचे, लोकप्रिय धडाडीचे मुख्यमंत्री, सर्वपक्षव्यापी राजकारणी देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच जाहीर विधाने केली आहेत त्यापैकी 'आमदार माजले आहेत असे लोकांस वाटते आहे अशी लोकभावना आहे.' हे मुख्यमंत्र्याचे विधानात्मक सर्वांना मान्य आहे. कदाचित ज्या आमदारांबाबत मुख्यमंत्र्यांना असे वाटते त्या आमदारांना सुद्धा आपण माजलेले आहोत याची जाणीव असेल. अशा पद्धतीची वक्तव्य करुन देवेंद्र फडणवीस यांची जबाबदारी संपत नाही. ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि त्यांची प्रतिमा जनसामान्यात चांगली आहे. ते ज्या पक्षाचे नेतृत्व करीत आहे त्या पक्षाच्या गुंडगिरीला पावन करुन घेण्याच्या भूमिकेबद्दल सुद्धा जाणून बोलायला पाहिजे. झाले बहु, होतील ही बहु, पण या सम हाच! या उक्तीप्रमाणे 'माजले आहेत बहु माजतीलही बहु, पण यांच्या शिवाय कोण सापडतच नाही, अशी व्यवस्था सत्ताकारण करण्यासाठी काय पण? भाजपाने करुन घेतली आहे का? अशी शंका निर्माण झाली आहे. या शंकेला दुजोरा सहज देता येईल अशी स्थिती सुद्धा सहज दिसते आहे. त्यासाठी संशोधन करण्याची गरज नाही.

देवेंद्र फडणवीस किंवा भाजपा यांनी गुंडगिरी पोसली आहे, किंवा गुन्हेगार आणि गुंडाना हेच पक्षप्रवेश किंवा पाठिंबा देतात असे बोलणे एकांगीपणाचे होईल सर्व पक्ष थोड्याफार प्रमाणात अशा प्रकारे सत्ता कारणासाठी राजकारण करतांना दिसतात. स्वत: देवेंद्र फडणवीस आपली राजकीय प्रतिमा नेहमी चांगली ठेवूनच आहेत. त्यांनी आपल्या छबी काटेकोरपणे चांगली राहील याची व्यवस्था केली आहे. पण राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांनी तोडफोड करुन इतर पक्षांना आपल्याबरोबर ज्यांना पावन केले. त्यांच्या कृती आणि उक्तीला जबाबदार राहिले पाहिजे. विधिमंडळात गोंधळ घालणारे, अध्यक्षांच्यासमोर आचरटपणा करणारे, सभागृहात उड्या मारणारे, जवळपास सर्वच पक्षाच्या सदस्यांचे कर्तृत्व नोंदले गेले आहे. फक्त एकाच कोणत्या पक्षाला किंवा पक्षनेतृत्वाला याबाबत दोष देता येत नाही. पण समाजकारणाच्या आणि राजकारणाच्या नावाखाली सर्वांना जास्त उलाढाल्या ज्यांनी केल्या आहेत त्या भाजपाच्याबाबत व दस्तुरखुद्द देवेंद्र फडणवीस यांचे कर्तृत्व उजळून की झाकाळून गेले आहे. काय बोलावे याबाबत जनता सभ्रंमित आहे.

अलिकडचे राजकारण हे केवळ सत्ताकारणासाठी आहे यामुळे असे होत आहे का? याचा विचार राजकीय धुरिणांना करणे भाग आहे. सत्ता स्थापनेसाठी तोडा फोडा जोडा राजकारण करणे भाजपाला अपरिहार्य होते म्हणून राज्यातल्या दोन बड्या पक्षांमध्ये फूट पाडून राजकारणाची प्रयोग फडणवीसांनी यशस्वी केला पण गड जिंकून पक्षात सिंह न ठेवता उगाचची कोल्हेकुई सुरु आहे. याचा भुर्दंड भाजपा सहीत मार्गदर्शक राष्ट्रीय सेवासंघाच्या विचारसरणीला पडतो आहे याचे भान पक्षाच्या आणि संघाच्या नेतृत्वाला येणार की नाही याबाबत आता शंका वाटते आहे. देवेंद्र फडणवीस दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत या अगोदरची कारकीर्द त्यांचे नेतृत्व उजळवणारे होते. आता ज्या पद्धतीचे सत्ताकारण, आघाडीचा धर्म पाळण्याची उठाठेव आणि तोडाफोडीचे गड सामावून घेण्याचे राजकारण महाराष्ट्राची प्रतिमा कलंकीत करीत आहे. सत्ताकारणाच्या शिरोमणीने मांडलेला उच्छाद, राणा दाम्प्त्य यांची चढाओढ करणारी चळवळ, गोपीचंद पडळकर, फ्री स्टाईल बॉनसर, संजय गायकवाड, थेट बेडरुमपर्यंत पैशांचा व्यवहार पारदर्शकतेने कॅमेऱ्यासमोर करणारे संजय शिरसाट निंदनीय कृत्य शिरोमणी संजय राठोड, संतोष बांगर, बाणेदार नेता श्री. रामदास कदम जे बाणेदारपणे सांगतात की आहे माझ्या पत्नीच्या नावे डान्सबारचा परवाना, त्यांचे पाठराखण करणारे त्यांचे नेते एकनाथ शिंदे, भर सभागृहात थेट प्रक्षेपण होत असतात. रमीचा डाव रंगवणारे माणिकराव कोकाटे मद्यसंबंधित परवाने एका दिवसात मिळणारे संदीपान भुमरे अशा अनेक शिरोमणी आपल्या कार्यकर्तृत्वाने कलंकित होताना महाराष्ट्र पाहतो आहे. स्वच्छ प्रतिमेचा उदोउदो करणारा भाजपा सारखा पक्ष मात्र अगतिकपणे की चाणाक्षपणे हे पाहतांना दिसत आहे. सुरुवातीच्या या युतीच्या आधारस्तंभांनी सर्वस्वी अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी आमच्याच पक्षातल्या सदस्यांचीच कृष्णकृत्येचे कशी समोर येतात असा सूर लावला होता पण तो लगेचच हा सुरु एका लयबद्धधीत कालवश झाला. कठोर शिस्तीच्या अजितदादांनी मवाळपणे, एकनाथ शिंदेनी हुशारीने आपआपल्या पक्षांतल्या सदस्यांना सांभाळून घेतले. थोडेफार समज देऊन शुद्ध करुन घेतले. बेबंद वर्तन करणाऱ्या सदस्यांना कारवाई का करीत नाही याचे कारणसुद्धा या राजधुरिणांनी दिले आहे. काय तर म्हणे विरोधकांची मागणी मान्य केल्यासारखे होईल! या सर्वांचे नेतृत्व करणारे देवेंद्र फडणवीस अगतिकपणे की संधीसाधू पद्धतीने गप्प आहेत. राज्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका याच बहुदा याचे कारण असावे. आता युतीला बाधा पोहचवून सर्वव्यापी सत्ता मिळविण्याचे भाजपाचे मनसुबे यामुळे नाऊमेद होतील. असे जाणकार मत व्यक्त करतात. भाजपाची राजकारण करण्याची पद्धत फार पूर्वापार अशी नव्हती. तोडाफोडा, आयाराम गयाराम कृती सर्वच पक्षात होतीच. पक्षकार्यासाठी, पक्षप्रवेश केले जात होते. आता पक्षप्रवेश, पक्षांची तोडफोड सत्ताकारणांसाठी केली जात आहे. भाजपाने स्वच्छताकेंद्र काढले आहे. जुना दो नया लो! अंदर आओ दाग धब्बे गायब! अशा काही स्किम सुद्धा काढलेल्या आहेत असे दिसून येते आहे.



मजेदार गोष्ट आहे की राजकारणात जनतेला किती कमी लेखले जाते याचा हे उदाहरण आणि पुरावा ठरेल असे सहज दिसेल. एकनाथ शिंदे भाजपा जवळ जाण्याअगोदर भाजपाबाबत, देवेंद्र फडणवीस यांच्या बाबत काय बोलत होते. फडणवीस अजितदादांना तुरुंगात टाकणार होते, त्यांचे स्थान ऑर्थर रोड जेलमध्ये आहे असे जाहीर सांगत होते. आणि त्यांना पावन करुन अर्थमंत्रीपद दिले. उपमुख्यमंत्री केले. नाशिकमधील कार्यकर्तृत्ववान बडगुजर यांच्या मागे फडणवीस हात धुवून पाठी लागले होते. त्यांची एसआयटी चौकशी करणार होते. त्यांच्यावर २९ गुन्हे दाखल असून त्यांच्याबाबत कारवाई करता करता त्यांना भाजपात सामावून घेण्याची कार्यवाही सुरु केली. बडगुजर पावन झाले. अनेक नावे घेता येईल ज्यांना भाजपाने त्यांच्या गुंडगिरीला गुन्हेगारीला पक्षात प्रवेश देऊन पावन करुन घेतले आहे. वाल्याचा वाल्मिकी होऊ नये अशी वृत्ती नाही पण एखाद्या वाल्याचा वाल्मिकी होईल असा विश्वास खरा ठरेल सुद्धा! पण येथे वाल्याला शोधायचा, वाल्याची टीम तयार करायची केवळ सत्ताकारणासाठी ते पावन झाले असे जाहीर म्हणायचे या वृत्तीचे करायचे काय? लॉन्ड्री कपड्यांचे डाग काढून स्वच्छ करते पण इथे राजकारणाखाली वेगळीच लॉन्ड्री चालू आहे. येथे मळलेले स्वच्छ होत नाहीच याऊलट मलीन प्रतिमा नेतृत्व गुण समजून त्यांना पावन केल्याचे जाहीर केले जात आहे.या अगोदर भाजपाच्या पक्षनेतृत्वाने अनेक गुंडगिरीच्या गुन्हेगारांच्या कृष्णकृत्यांना आव्हान दिले आहे.

महाराष्ट्रभरात त्याची उदाहरणे आहेत परंतु आता त्याच पक्षाच्या गुंड पुंड नेत्यांशी भाजपाने सलगी वाढवली आहे. काल ज्यांच्या टिकेला धार आणणारी व्यक्तीमत्वे आज भाजपाचे सत्ताधारी सोबती आहेत परंतु ही स्थिती कायम राहणार नाही. उद्या सत्ताकारणासाठी एकत्र आलेली साधन शुचिता न पाळणारी, राजकारणाची नितीमूल्ये पायदळी तुडवणारी, जनतेचा अनादार करणारी, जनप्रक्षोभाला कारण ठरल्याशिवाय राहणार नाही. उद्या जेव्हा भाजपाच्या वाट्याला जनप्रक्षोभ, उनउपेक्षा वाट्याला येईल तेव्हा पावन करुन घेणारी लॉन्ड्री, स्वच्छताकेंद्र पूर्णपणे कलंकित मलीन झालेले दिसेल. सत्तास्थापनेसाठी खूप कालावधी खर्च होतो. पण ती टिकवण्यासाठी योग्य नितीधोरण राबवण्याचे कष्ट उचलावे लागतात. जनतेच्या कष्टाला, जनतेच्या भल्यासाठी भाजपाला हे भान कधी येईल याची वाट पहायला पाहिजे. **

## बॅनरबाज कॉमेडी तडका




**निलेश साठे**

माणसाला स्वत:ची जाहिरात करण्याची खूप सवय झाली आहे. अगदी जन्माला आल्यापासून जी जाहिरात बाजी सुरू होते ती अगदी शेवटपर्यंत. आला जन्माला बनवला बॅनर. एक वर्षाचा झाला बनवला बॅनर दोन वर्षाचा झाला पाच वर्षाचा झाला दहा वर्षाचा झाला बनवला बॅनर. हे बॅनर बनवण्याची इतकी सवय झाली आहे की कुणाचे किती आणि कुठले बॅनर बनवावे याच्यावर नियम बनवण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आता हेच पहा ना. थोड्याच दिवसात आपल्या लाडक्या गणरायाचे आगमन होईल. सगळीकडे प्रसन्न वातावरण असेल. आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागताचे चोहोकडे बॅनर लागलेले असतील. सगळीकडे सुस्वागतम सुस्वागतम असे स्वागताचे बॅनर असतील. सगळीकडे सुमधुर भक्ती गीते लावलेली असतील. साग्र संगीत चालू असेल त्या कर्णमधुर भक्ती गीतांसोबत हे बॅनर पाहताना मन प्रसन्न होऊन जातं. या आल्हाददायी वातावरणामध्ये सगळीकडे गणरायाचे सुंदर आणि मनमोहक रूप दिसणार आणि मध्येच एखाद्या बॅनरबाजाचा मयताचा बॅनर येणार.

'आप्पा तुम्हाला जाऊन आज दहा वर्षे झाली. तरीसुद्धा तुम्ही आमच्या हृदयात आहात.'

आता हा आप्पा जेव्हा जिवंत होता पाच मिनिटे सुद्धा त्याच्यासोबत गप्पा नाही मारल्या. कधी याचा एक टप्पा होतो याची वाट पाहिली. आणि बॅनर लावलाय तुम्ही अजूनही आमच्या हृदयात आहात. बरं या आप्पानं कधी कुणाला पाच रुपयाचा चहा नाही पाजला. त्याचे दहा ठिकाणी बॅनर लावलेत. गावभर दिंडोरा पिटायचं चालू आहे. हे बॅनर बघून कित्येक जण तर म्हणतात, बरं झालं टपकला लवकर लय खडूस होता म्हातारा. अशी तऱ्हा.

दुसरा एक बॅनर येतो कैलासवासी पोपटराव तात्या यांचे वयाच्या १०७ व्या वर्षी निधन. अरे अजून त्यांनं किती जगायचं होतं शंभरी पार केली की. पण तुम्ही मात्र जाहिराती सोडू नका. बरं त्या फोटोमध्ये तात्याचं हातभर दात बाहेर. बटाटे एवढे डोळे. त्याला फोटोत बघूनं घाबरायाला होतंय. प्रत्यक्ष बघितलं तर एखाद्याला अटॅक यायचा. आणि हे बॅनर वर म्हणतोय अल्पशा आजाराने निधन. ज्यांचं समाजामध्ये नाव आहे समाजासाठी काहीतरी भरीव कार्य केले आहे त्यांच्या सन्मानार्थ लावा की बॅनर. पण ज्यांना चाळीत कुणी विचारेना आणि याचे गावभर बॅनर लावलेत.

कुणी कुणी गाडीवर सुद्धा एक लाइन लिहित असतो. आजोबांची कृपा. म्हणजे याला आजोबाने पैसे दिले तेव्हा यानं गाडी घेतली. पण नातवाच्या कृपेने गाडी घेतली असं कधी कुठल्या आजोबांनी नाही लिहिलं. नातवाची कृपा होऊ द्या की आजोबावर कधीतरी. घराचं नाव असतं शांती निवास. अन् चोवीस तास घराबाहेर कुत्रं भुंकतेय. बोंबला तेच्या आयला. कधी कधी हे बॅनर अशा ठिकाणी लावतात तर कुत्रे त्याचा पुरेपूर वापर करतात. एकदा लावलेला बॅनर घरातला दुसरा टपकायची वेळ आली तरी काढला जात नाही. इतकं खूळ या बॅनरबाजीचं. खरंतर जाणारा कधीच म्हटला नसेल माझे बॅनर लावा म्हणून तो निघून गेला. खरं तर हे मागचेच जगाला दाखवून देण्याचा प्रयत्न करतात की आमचा किती जीव होता त्यांच्यावर. कुणी कुणी तर कुत्र्या मांजराचे बॅनर लावतात आणि म्हणतात हरवला आहे शोधून देणाऱ्यास योग्य बक्षीस दिले जाईल. भक्तानी गणपती बघायचे का यांचे कुत्री मांजरं शोधायची. कुत्र्या मांजरांचे शोक चे बॅनर सुद्धा कधी कधी बघायला भेटलेत. लोक खुशीने आनंदाने बाहेर फिरायला निघालेले असतात आणि हे म्हणतात आमच्या दु:खामध्ये सामील व्हा. सार्वजनिक ठिकाणी बॅनरबाजी केली म्हणजे अर्थ काय घ्यायचा. ज्यांना वाचता येत नाही त्यांना इथे फायदा होतो. त्यांच्यासाठी सगळं सारखेच.

सणासुदीचे दिवस असतील सगळीकडे छान आणि प्रसन्न वातावरण असेल तेव्हा या मयताचे बॅनर लावावे की नाही याचा विचार करण्याची खरंतर गरज निर्माण झाली आहे.

# शंभरीतला हसवणारा माणूस

**शि. द. फडणीस यांनी संपूर्ण आयुष्य कलेसाठी समर्पित केले. वयाची शंभर वर्षे पूर्ण केल्यानंतर सत्कार समारंभातील भाषणातही त्यांनी मस्त टोलेबाजी केली आणि वय हा केवळ एक आकडा असल्याचे दाखवून दिले. त्यांच्या चित्रांबद्दल बोलायला 'निर्विश अभिव्यक्ती' एवढेच शब्द पुरेसे आहेत. उत्तम रेषा, उत्तम आणि प्रसन्न रंगसंगती आणि त्यातून पुढे येणारा विनोद ही त्यांची बलस्थाने आहेत.**



**सतिष पाकणीकर**

मी शि. द. फडणीस यांना ओळखत होतोच पण, १९९२ मध्ये परिचय झाला आणि हळूहळू ओळखीचे रुपांतर स्नेहामध्ये झाले. अनेक वेळी, अनेक प्रसंगी आम्ही भेटलो. भेटत राहिलो. कामानिमित्ताने वा त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भेटीगाठी वाढत राहिल्या. माझ्या एका कॅलेंडरचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्यांच्या हस्ते मला 'गानवर्धन'चा पुरस्कारही देण्यात आला होता. या सगळ्यातून स्नेह वृद्धगत होत गेला.

मी फोटोसेशन केले तेव्हा ते ९४ वर्षांचे होते. त्यामुळे मला प्रकर्षाने त्यांच्यातील काही स्वभाववैशिष्ट्ये अनुभवायला मिळाली. त्यातील एक लखलखीत उठून दिसलेली बाब म्हणजे त्यांचा व्यवस्थितपणा. कलाकार म्हटल्यानंतर गबाळा राहायला हवा, लहरी असायला हवा, त्याने चित्रविचित्र कपडे घातले पाहिजे, कानात-गळ्यात काही घातले पाहिजे, केस वाढवून रबर लावले पाहिजे... असा एक विचार असतो. पण अशा कोणत्याही प्रकारचा दिखावा नसूनही ते इतके मोठे कलाकार आहेत! फोटोसेशनला आले असता त्यांनी स्वत: आपले फोल्ड करुन आणलेले इझल लावले. खरे तर ते सहाय्यकाकडून हे काम करवून घेऊ शकले असते. माझ्याकडील कोणाला, 'एवढे करुन द्या' असे सांगू शकले असते. पण ९४ वर्षी त्यांनी हे काम स्वत: केले. दिलेल्या म्हणजेच बरोबर चार वाजता ते स्टुडिओत हजर होते. इथेही कलाकार वक्तशीर नसतात, हा समज त्यांनी खोटा ठरवला. कारण सहसा कलावंत आपला लहरीपणा दाखवण्यासाठी, वेगळेपण समोर मांडण्यासाठी बरेच आढेवेढे घेतात. काम होईल की नाही माहिती नाही, तुम्ही सातत्याने पाठपुरावा करा, असे ते अगदी सहज म्हणून जातात. पण शिदं याला अपवाद आहेत. बाहेरच नव्हे, तर घरातही त्यांचा हा वक्तशीरपणा, टापटीप अनुभवायला मिळते. त्यांच्या दाराची बेल वाजवली की कधी ते तर कधी त्यांची पत्नी दार उघडवायच्या. आतमध्ये जातात लक्षात यायचे की ते बाहेर जाण्यास निघाले आहेत. इतके ते तयार होऊन बसलेले असायचे. एकदा मी त्यांना विचारलेही होते की, तुम्ही बाहेर निघाला असाल तर लगेच निघतो. तेव्हा त्यांचे उत्तर होते, 'नाही; आम्ही कुठेच निघालेलो नाही. घरातच आहोत...!' घरातही इतके टापटीप राहण्याची त्यांची सवय भावणारी आहे.

शंभर वर्षे वयातही मनाने तरुण असणारा हा चित्रकार आहे. समोरच्या माणसाचे शांतपणे ऐकून घेत, त्याच्या पातळीवर उतरुन बोलत, त्याचे काय नवीन चालले आहे हे जाणून घेत गप्पा फुलवणे त्यांना आवडते. आजही कधी त्यांना फोन केला की, नवीन काय चाललंय, हाच त्यांचा प्रश्न असतो. मुख्य म्हणजे ते दाखवत असणारी समयसूचकता उल्लेखनीय वाटते. एखाद्या प्रसंगाला साजेसे बोलण्यात त्यांचा हात धरु शकणारे फार थोडे लोक बघायला मिळतील. इथे एक किस्सा सांगतो. ९४ व्या वर्षानिमित्त त्यांचा सत्कार केला असता उत्तरादाखल ते म्हणाले होते, '९४ वर्षात पदार्पण केल्याबद्दल इथे माझा सत्कार होत आहे, पण ९४ वर्षे लागण्यासाठी मी काहीच केलेले नाही...' या साध्या वाक्याने त्यांनी रसिकांना आपलेसे करुन घेतले होते. सांगायचा मुद्दा हा की, मी खूप मोठा आहे हे सांगण्याचा वा दाखवण्याचा भाव त्यांच्या बोलण्यामध्ये कधीच डोकावत नाही.



त्यांच्या चित्रांबद्दल बोलायचे तर 'निर्विश अभिव्यक्ती' एवढेच शब्द पुरेसे आहेत. ते कधीच कोणाबद्दल वाईट बोलत नाहीत. कोणाचा दुस्वास करणे त्यांच्या स्वभावात नाही. वाईटापेक्षा चांगले काय आहे, हे ते शोधतात आणि त्यावरच बोलतात. त्यांचे स्वत:चे काम तर सर्वोत्तम आहेच. उत्तम रेषा, उत्तम आणि प्रसन्न रंगसंगती आणि चित्रातून येणारा विनोद ही त्यांची बलस्थाने आहेत. यामुळेच ७० वर्षांनंतरही त्यांची चित्रे फ्रेश वाटतात. १९५२ मध्ये त्यांचे पहिले चित्र दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर झळकले आणि खूप चर्चा झाली. त्याच सुमारास 'ठंडी हवाए, लहराके आए' हे गाणेही आले. आजही लताबाईंच्या आवाजात ते ऐकतो तेव्हा खरोखर अंगावर थंड हवेची लहर आल्यासारखे वाटते आणि अगदी याच पद्धतीने 'मोहिनी'च्या अंकामधील शिदंचे ते चित्र पाहून हसू येते. इतक्या वेळा बघूनही त्याची खुमारी कमी होत नाही. अर्थातच हे वर उल्लेख केलेल्या सगळ्या गुणांमुळे घडले आहे. त्यांनी संपूर्ण आयुष्य कलेला समर्पित केले. अगदी वयाची शंभर वर्षे पूर्ण केल्यानंतर केल्या गेलेल्या सत्कार समारंभातील भाषणातही त्यांनी मस्त टोलेबाजी केली आणि वय हा केवळ एक आकडा असल्याचे दाखवून दिले. यावेळी त्यांनी कोल्हापूरच्या आठवणी काढल्या. तेथे दोन गोष्टींचा पाठपुरावा केला जातो, एक म्हणजे चित्रकला आणि दुसरी तालीम.. असे म्हणत ते पुढे म्हणाले, मी दोन्ही करण्याचा प्रयत्न केला. पण त्यातील एकच जमले. काय जमले हे तुम्हाला माहिती आहे, असा पंच त्यांनी टाकला. वयाच्या शंभराव्या वर्षी हातात कागद न घेता हजारएक लोकांसमोर बोलणे आणि बोलताना प्रत्येकाला हसवत ठेवणे ही फार मोठी गोष्ट आहे. शिदंना ती साधली आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि अनेकानेक शुभेच्छा.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

## कला आणि कल्पना यांचा संगम

### - चारुहास पंडीत, प्रसिध्द व्यंगचित्रकार

**त्यांची चित्रे बघताना नेहमीच एक आल्हाद जाणवतो. कामाचे हेदेखील एक वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यांनी तांबडा वा पिवळा असे भडक रंग वापरले तरी डोळ्याला खुपत नाहीत, कारण आसपास वापरलेल्या रंगांनी निर्माण केलेले वातावरण चित्र आल्हाददायक करते. त्यात कठोरपणा नावालाही राहात नाही. त्यांच्या चित्रातील आकारही साधे आहेत. इंग्रजीतला 'सपलीफाईड' हा चपखल शब्द यासाठी योग्य ठरेल. पण असे असले तरी चित्रातील प्रत्येक आकार आपले म्हणणे ठसठशीतपणे मांडत असतो. तो या अर्थाने की, त्यांनी चितारलेली कोणतीही फिगर ताठ, सरळ उभी असलेली दिसत नाही. त्यात एक लय असते. शिदंच्या चित्रातील ही लयही फार महत्त्वाची वाटते, कारण त्यामुळेच त्यांचे चित्र अत्यंत आकर्षक दिसते. खेरीज एखाद्याने चित्र कसे बघावे, या दृष्टीने त्यांनी चित्रांची मांडणी केलेली दिसते. म्हणजेच मुख्य विषय काय, तो चित्रात कशा पद्धतीने यायला हवा याचा विचार करुनच त्यांनी चित्र काढलेले असते. यामुळेच बघणाऱ्याला ते कसे पहावे, याची दृष्टी मिळते. चित्रांची नक्कल करणे, हुबेहुब चित्र साकारणे हे प्रकार या क्षेत्रात अगदी सर्रास घडतात. असे असताना शिदंच्या स्टाईलची कॉपी फारशी दिसत नाही, हेदेखील एक वैशिष्ट्य वा वेगळेपण म्हणावे लागेल. याचे कारण म्हणजे त्यांच्या चित्रांमध्ये असणारा सोपेपणा हेच खूप अवघड काम आहे! शेवटी हास्यचित्र म्हणजे कला आणि कल्पना यांचा संगम असतो. एखाद्याकडे नुसती कला असून उपयोग नसतो. एखाद्याकडे कल्पना आहे पण कला ती पोहचवू शकत नसल्यास उपयोग नसतो. या दोन्हीचा समतोल साधला जातो तेव्हाच एक सकस कलाकृती तयार होते आणि अनेक वर्ष टिकून राहते. हा समतोल शिदंच्या चित्रांमध्ये पहायला मिळतो. कल्पनाचित्रांमधून पूर्णपणे उमटलेला दिसते. म्हणूनच त्यांची चित्रे आजही लक्षवेधी ठरतात.**

# कोकणच्या दशावतारी बालगंधर्वांची अकाली एक्झिट...

धनंजय शेटये

कोकण म्हणजे नुसता निसर्ग नव्हे तो एक सजीव श्वास आहे, ज्यामध्ये मातीतून येणारा घाम, लोककलेतून झरझरणारा भावनांचा झरा, आणि गाभाऱ्यापर्यंत भिडणारी पारंपरिक ओळख साठलेली आहे. या कोकणच्या मातीचा सर्वात झळझळीत ठसा म्हणजे दशावतारी नाट्यकला.

ही कला केवळ मनोरंजन नव्हे ती भक्ती, परंपरा, अध्यात्म आणि अभिव्यक्ती यांची चैतन्यमयी सांगड आहे. पौराणिक कथांचा आधार घेऊन, लंगार नृत्य, गायन, संवाद, विनोद आणि रंगीत वेशभूषेने नटलेले हे दशावतार नाट्य कोकणातील जनजीवनात जणू श्वासासारखं मिसळलेलं आहे.

विशेषत तळकोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात, दशावतार ही लोकसंस्कृतीची आत्मा मानली जाते. एकेकाळी घराघरांतून ही नाट्यसंस्कृती ऐटीनं वावरत होती.





या परंपरेतील एक तेजस्वी दीपक म्हणजे प्रशांत रामचंद्र मेस्त्री. अभिनय, गायन, नृत्य, वेशभूषा आणि संवादफेक यांचं सुसंगत मिलाफ म्हणजे प्रशांत यांचा रंगमंचावरचा अविष्कार. त्यांनी साकारलेल्या स्त्रीभुमिका म्हणजे अभिनयाचे विद्यापीठ होते द्रौपदी, कुंती, देवयानी, तारा, पार्वती या सर्व भूमिका त्यांनी इतक्या आत्मसात केल्या होत्या की प्रेक्षक त्यांच्या भावनांच्या लाटांमध्ये न्हालेलं पाहायला मिळायचे.त्यांच्या अभिनयातील सौंदर्य हे केवळ शरीरप्रदर्शनात नव्हतं, तर त्यातील मनोवृत्ती, मूक अश्रू, आणि विनम्र हतबलतेत होतं.

रंगमंचावर ते जेव्हा दुःख साकारायचे, तेव्हा प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रू वाहायचे. त्यांच्या आवाजातील कंप आणि सुरांतील सोज्वळपणा हे त्यांच्या अभिनयाला एक वेगळंच चैतन्य देत असे.

शालेय वयात सरस्वती पूजनसारख्या कार्यक्रमांतून सुरुवात करून, प्रभाकर पार्सेकर नाट्यकंपनीत लहान भूमिकांपासून अभिनयाची पायाभरणी केली. आणि पाहता पाहता दशावतारी नाट्यविश्वातील स्त्रीभुमिकांचा नटसम्राट म्हणून नावारूपाला आले.

मान्सून महोत्सवात सादर झालेलं द्रौपदी वस्त्रहरण नाटकात त्यांनी नेसलेल्या ३५ साड्या याचा अभिनय इतका प्रभावी होता की तो प्रसंग दशावतारी इतिहासात अजरामर ठरला.

या पारंपरिक कलेत, जेव्हा फार कमी मानधन मिळतं, तिथे कलावंतांना हौस आणि तळमळीच्या जोरावर काम करावं लागतं. प्रशांत मेस्त्री हे त्याचे सर्वोच्च उदाहरण होते. त्यांनी कधीही या कलेचा व्यवसाय केला नाही, तर तिला आपले जीवनकार्य मानले होते.

स्त्री भूमिका साकारताना लागणाऱ्या शरीरभाषेपासून (कायिक अभिनय), संवाद फेक (वाचिक अभिनय), ते मुखाभिनय, नेपथ्य आदींचं प्रत्येकीचं बारकाव्यानं चिंतन त्यांनी केले होते. ही तळमळ म्हणजेच त्यांची खरी विद्याशाखा होती.

महादेव लोक, आप्पा दळवी यांच्यासारख्या अभिनय सम्राट अभिनयाचे सच्चे अनुयायी असलेले प्रशांत, त्यांचे नाव उच्चारले की अभिनय समृद्धी आठवते.

दशावतारी नाट्यकला एक झळाळता वारसा दशावतार म्हणजे केवळ रामायण-महाभारत सांगणारी कला नव्हे, तर ती काळाच्या प्रवाहात देखील कोकणातील समाजाचं भावविश्व जपणारी परंपरा आहे. कोकणातील ''मंदिरांतील देवभूमिका, गावजत्रा, सण-उत्सव '' यात दशावतारांचे प्रयोग म्हणजे श्रद्धेचा सोहळा असतो.

यातील रंगपंचमी, निवृत्ती, विनोदप्रधान 'शाहीर' या सगळ्यांचा समावेश करणारी बहुआयामी लोककला कोकणात आजही टिकून आहे, आणि ती जगते प्रशांत मेस्त्री यांच्यासारख्या समर्पित कलावंतांमुळेच.

दशावतारी नाट्य हा एक चलितधार्मिक उत्सव आहे. अनेकदा या नाटकांत रात्रीपासून पहाटेपर्यंत सादरीकरण चालतं. प्रेक्षक झोपही घेत नाहीत. इतकी ती एक जीवंत गोष्ट असते. अशा वातावरणात अभिनय करणं हे फक्त काम नाही ती भक्ती असते.

एक काळ संपला...

प्रशांत मेस्त्री यांचं निधन केवळ एका कलाकाराचं निधन नव्हे ती दशावतारी रंगभूमीच्या एका संपूर्ण पर्वाची एक्झिट होती. आज त्यांनी घेतलेली ही अचानक एक्झिट कोकणच्या नाट्यविश्वावर गडद सावली सोडून गेली आहे.

त्यांच्या जाण्याने फक्त एक कलाकार नाही गेला, तर एक सांस्कृतिक दीप मालवला गेला.

प्रशांत मेस्त्री यांचा सहजसुंदर अभिनय, सुमधुर गायन, सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती, आणि पारंपरिकतेचा अभिमान हे सगळं दशावतारी परंपरेच्या काळजात आजही धडधडत आहे.

त्यांच्या आठवणी त्या हसऱ्या डोळ्यांत, त्या नटलेल्या मंचावर, त्या उंबरठ्याशी उभ्या असलेल्या द्रौपदीच्या पदन्यासांत आजही जिवंत आहेत.

'प्रशांत मेस्त्री कोकणच्या रंगभूमीतील खऱ्या बालगंधर्वाला सशब्द श्रद्धांजली!'

# गावाची बखर सांगणारे नाव नसलेलं गाव

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

''नाव नसलेलं गाव'' ही ॲड. विलास कृष्णाजी नाईक यांची, सामाजिक कादंबरी संवेदना प्रकाशनने प्रकाशित केली आहे. या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचे निवृत्त पुराभिलेख संचालक डॉ. भास्कर धाटावकर यांची वेधक प्रस्तावना लाभली आहे. या कादंबरीत लेखकाने निर्जीवात प्राण फुंकले आहेत. कोकणची पार्श्वभूमी असलेल्या एका गावाची कहाणी यातून उलगडते आहे. लेखकाने आपले 'मनोगत ' मांडले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, या कहाणीला अंत नाही. त्यामुळे सुखांत नाही की दुःखांतही नाही. हा खडतर प्रवास न टाळता येणारा आहे. या पुस्तकांमध्ये एकूण दहा निर्जीव वास्तूंची मनोगते वाचावयास मिळतात. पुस्तकाचे अप्रतिम, रंगीत मुखपृष्ठ निलेश जाधव यांनी साकारले आहे.

मी 'साकव', या पहिल्या आत्मकथनात, स्वतःची ओळख नाव नसलेल्या गावाचा स्वर्गवासी इतिहासपुरुष अशी करून दिली आहे. सत्तरीच्या वयाच्या साकवाची कहाणी, माजी सभापती आबा भोसले, तरुण मुलांना सांगतात. श्रावणात ओढा दुथडी भरून वाहायचा. त्यावरून जाण्यासाठी केलेला लाकडी पूल म्हणजे साकव. ओढा पार करण्यासाठी मोठ्या झाडांची खोडे, लाकडे आडवी ठेऊन त्यावरून चालत जाण्याची सोय केली जाई. तो मनेही जोडत होता. तीन-चार वर्षांनी साकवाचे पुनरुज्जीवन करावे लागे. साकव ओलांडताना कधी अनर्थ घडे. शिऱ्याने ओढ्यात पडलेल्या एका पोराला, वाहून जाताना धाडसाने वाचवले होते. साकवावरून जाणाऱ्या लहान मोठ्या माणसांच्या, होळीच्या माळावर जाणारी बहिरीची गावदेवीची पालखी यांच्या स्मृती साकवाने जपल्या होत्या. दिवाळीत विकासचा बाबा, तहसीलदार म्हणून बदलून आलेला असतो. या कडक माणसाची आठवणही साकवाने जपली आहे. या मामलेदाराने गावातील एक पडके, दुर्लक्षित घर दुरुस्त करून आपलेसे केले होते. गावासंबंधीच्या अन्य सणांच्या आठवणींची या साकवाने सांगितल्या आहेत.

मी जेलमधली शाळा!, या लेखात, पूर्वीच्या इंग्रजांच्या काळातील तुरुंगाचे नंतर शाळेत झालेल्या रूपांतराची दीर्घ कहाणी वाचावयास मिळते. चौथीपर्यंतचे शाळेचे वर्ग तेथे भरत होते. कालांतराने कोंडावर तालुक्याची शाळा सुरू झाली. विविध गुरुजी, शाळकरी मुले यांच्या अनेक आठवणी या जेलमधल्या शाळेने जपल्या आहेत. येथे शिकणाऱ्या विकास आणि शिरीषची जोडी चांगली जमली होती. गुरुजी मुलगा कोणाचा आहे, याचा विचार न करता, सर्वांनाच कडक शिक्षा करीत असत. पालकही त्यांना प्रोत्साहन देत असत. परिणामी व्रात्य मुले अभ्यासाकडे वळत. हे सारे वाचताना प्रस्तुत लेखकाला जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती यांचे एक प्रसिद्ध वचन आठवले. ''शाळा आणि तुरुंग या जगातील दोनच जागा अशा आहेत की, जेथे कोणीच स्वतःहून जात नाही; तर तेथे दाखल करावे लागते.'' येथे तर तुरुंगाचेच रूपांतर शाळेत झालेले होते!

'मी मामलेदाराचे घर' मध्ये कोकणातील परंपरागत घराचे वर्णन येते. घर जुने, बंद आणि अडगळीत पडलेले. परंतु मामलेदार यांनी हे घर निवडले. त्यासंबंधीच्या दंतकथांकडे, भीतीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. छोट्या विकासने देवदिवाळीला आलेल्या घर मालकाने केलेली गुप्तपूजा, लपून पाहिली होती. त्यामुळे त्याचेही वर्णन येते. गावातील काही नमुनेदार माणसांची ओळख या लेखातून होते. मी भैरीचा चौथरा, या लेखात गावच्या होळीचे सविस्तर वर्णन केले आहे. काशिनाथ खेडेकर या




भगताची ओळख यातून वाचकाला होते. मी हनुमान मंदिरने गावातील हनुमान मंदिर हे कसे सांस्कृतिक केंद्र झाले होते, याची कल्पना येते. गावातील पाणीपुरवठा त्याकाळी कसा सुरू झाला याच्या सविस्तर आठवणी मांडल्या आहेत. मी विठोबाची विहीर, मध्ये कोकणातील वेगवेगळ्या प्रकारच्या विहिरींची ओळख होते. मंदिर आणि विहिरीच्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे सुंदर, सविस्तर वर्णन आले आहे. रेगेकाकांची त्यांच्याच विहिरीतील आत्महत्या आणि त्या वेळचे त्यांचे प्रेत हे दृश्य छोट्या विकासच्या मनावर कोरले गेले. मी किल्ल्याची तोफ, या लेखातील गावाच्या पश्चिमेकडल डोंगरावरील दुर्लक्षित किल्ल्याची कहाणी समजते. मंदिर, दर्गा या दोघांचे महत्त्व त्याकाळी टिकून होते. धार्मिक श्रद्धाअंधश्रद्धांचा गावकऱ्यांवर पगडा असूनही गावातील सामंजस्य टिकून होते. मी नदीवरील पाण्याची टाकी, या आत्मवृत्तातून नळाद्वारे पाणीपुरवठा योजनेतून गावाचा विस्तार आणि विकास कसा झाला याची कल्पना येते. गावाच्या हिताकडे लक्ष देणाऱ्या विठ्ठलशेठ यांचे व्यक्तिमत्त्व विशेष स्वरूपाचे आहे. मी मी सरकारी दवाखाना, या आत्मवृत्तातून, तेथे तालुक्याच्या जागी आलेल्या सेवाभावी, डॉ. सोलकर या मुस्लिम डॉक्टरची ओळख होते. शाळेचा विस्तार करण्यासाठी आयोजित केलेले जादूचे प्रयोग आणि चित्रपटांचे कार्यक्रम यामधून शिक्षण संस्थांच्या प्रगतीतील सर्व गावकऱ्यांचे योगदान कसे लाभले होते, हे समजते. मी सरकारी विश्राम गृह, या लेखातून हे विश्रामगृह गावातील अनेक गोष्टींची नोंद घेते आहे. त्या काळातील हिंदू - मुस्लिम आणि जाती-जातीतील सौहार्द जपले जात होते, याची विशेष जाणीव होते. गावातील तरुण नोकरीसाठी मुंबई आणि अरब देशांत गेल्याने, कोकणातील छोट्या तालुक्यांच्या गावांतील, निर्माण झालेल्या सामाजिक आणि कौटुंबिक समस्यांची जाणीव होते. या समस्येची तीव्रता आजच्या काळात खूपच वाढली आहे.

कोकणातील एका तालुक्याच्या गावी, सत्तरच्या दशकात कसे विविध बदल होत गेले, याची विलक्षण कहाणी शाळकरी विकासने तपशीलवार सांगितली आहे. पृष्ठ ९४ वर, चिखली गावात टिळक जन्माला आलेले ,असा सदोष उल्लेख आहे. लोकमान्य टिळकांचा जन्म रत्नागिरी येथे झाला होता. त्यांचे मूळ गाव चिखलगाव होते. साने गुरुजींचे जन्मगाव पालघर असा सदोष उल्लेख झाला आहे. त्यांचा जन्म दापोली तालुक्यातील पालगड येथे झाला. विलास नाईक यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील, एका मागासलेल्या तालुक्याच्या गावाच्या आठवणी शाळकरी विकासच्या दृष्टीतून प्रभावीपणे मंडल्या आहेत. निर्जीव वास्तूंकडून एका निनावी गावाची, दीर्घकालीन कहाणी वाचकांसमोर उलगडण्यात लेखक विलास नाईक यशस्वी झाले आहेत. ॲड. विलास नाईक यांचा परिचय शेवटी त्यांच्या छायाचित्रासह दिला आहे.

पुस्तकाचे नाव : नाव नसलेलं गाव
लेखक : ॲड.विलास कृष्णाजी नाईक
९४२२४९३०३०
प्रकाशक : संवेदना प्रकाशन चिंचवडगाव, पुणे - ३३. प्रथम आवृत्ती : १२.१.२०२५ पृष्ठे :१२०.
मूल्य : रु.२००/-

## कविता

### शहीद

जनरल अरुणकुमार
वैद्य साहेब
लष्करप्रमुखही तुमची
महान शान
रायगडालाही असे खूप मान
देशासाठी शहीद,
देशवासियांना अभिमान
देशाकरीता प्रदीर्घ सेवा
करी उंच आकाशी सन्मान
कुशल, कल्पक नेतृत्वाने
केले अपणांस महान
निडर वृत्तीने,
जागवून आत्मविश्वास
परतविला ताकदवार
प्रतिहल्ला
पाकसैन्यांची उडवली
दाणादाण
महावीर चक्राने
झाला सन्मान
ऑपरेशन ब्लू स्टार
धाडसी यशस्वी
केली मोहीम
बलिदानाने जग हे गहिवरले
करती सारे स्मरण
करुन प्रणाम

– राजाराम भगत
मोठे शहापूर,

# आगस्ट क्रांती दिन चिरायू होवो!

भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळाले नाही, त्यासाठी इथे भारतीय नेत्यांना फार मोठा त्याग करावा लागला.कित्येक क्रातीकारक लढले. शहीद झाले. काहींची नावं इतिहासात नाहीत. काहींची आहेत. पण जे जे या देशासाठी लढले.त्यांच्या प्राणांच्या बलिदानाचा इतिहास भारत देश विसरू शकत जरी नसला तरी आजही काही लोकं त्यांना शिव्या हासडतांना दिसतात. ही या देशाची शोकांतिका आहे. निदान आपण तरी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी काही करु शकलो नाही. आताही करण्यासारखे असूनही करु शकत नाही. हे सगळे विसरुन त्यांना शिव्या देण्याचे नव्हे तर बदनाम करण्याचे काम नेहमी काही लोकं करीत असतात.

खरं तर नऊ ऑगस्ट हा क्रांतीदिन म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. पण असे असले तरी या दिवसासाठी आठ ऑगस्टलाही जास्त महत्व आहे. याच दिवशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मुंबईमध्ये एक प्रस्ताव पारित केला.त्या प्रस्तावानुसार नऊ ऑगस्टपासून आपण चलेजाव भारत छोडोचं आंदोलन करु असं ठरलं. प्रत्येक नेत्यांनी रस्त्यावर उतरुन अहिंसक मार्गाने स्वातंत्र्याचा उठाव करु असं ठरलं. त्याला कारणंही तसेच होते.

१९३९ ला द्वितीय महायुद्ध सुरु झालं. त्या महायुद्धात जर्मन फौजांनी इग्लंडवर सरशी केली. त्यावेळी येथील भारतीय नेत्यांना इंग्रजांनी म्हटलं होतं की, तुम्ही आम्हाला मदत करा.बदल्यात आम्ही तुम्हाला स्वातंत्र्य देऊ. पण ज्यावेळी युद्ध संपलं, तेव्हा त्या इंग्रजांनी भारतीयांना दगा देत त्या स्वातंत्र्य देण्यापासून माघार घेतली. त्यामुळं पर्यायानं भारतीय नेत्यांची मनं नाराज झाली. म्हणून त्यांनी चले जावचा उठाव करण्याचे ठरवलेल.

या संदर्भात आठ ऑगस्टला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची बैठक होण्यापूर्वी त्याच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची बैठक चार ऑगस्टला झाली. आपल्याला इंग्रजांनी धोका दिला या विषयावर ती बैठक होती. आपण अहिंसक मार्गाने उद्या रस्त्यावर उतरु हेही विषय होते. परंतु याला बैठकीतील काही लोकांची सहमती झाली नाही. त्यातच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सी राजगोपालाचारी यांनी याच विषयाच्या संदर्भात पार्टी सोडली. त्यामुळे चार ऑगस्टला झालेली बैठक निष्फळ झाली. त्यामुळे त्याच्याच चार दिवसानं म्हणजे आठ ऑगस्टला परत बैठक भरली. तिही याच विषयावर.



या बैठकीतही हाच विषय होता. पण याही बैठकीत हिंदू महासभा, मुस्लिम लीग व भारतीय कम्युनिस्ट पक्षीने विरोध केला. त्यांचे म्हणणं होते की, अहिंसक मार्गाने जरी आपण आंदोलन करीत असलो तरी इंग्रज आपल्याला सोडणार नाहीत. ते आंदोलन दडपवून टाकण्यासाठी बळाचा वापर करतील गोळ्या झाडतील. मग त्या कित्येक भारतीय लोकं मरतील. म्हणून हो आंदोलन नको. पण आंदोलन जर केलं गेलं नाही तर या देशातून इंग्रज कधीच जाणार नाही असे तत्कालीन भारतीय नेत्यांना वाटत असल्याने त्यांनी काही संघटनांचा विरोध होवूनही आंदोलन छेडले. आठ ऑगस्टला प्रस्ताव पारित झाला व नऊ ऑगस्टला आंदोलनाला सुरुवात झाली.

हे आंदोलन भारतीयांसाठी नवं नव्हतं. यापुर्वीही दहा मे १८५७ ला देशात असंच आंदोलन झाले होते. तो १८५७ चा राष्ट्रीय उठाव म्हणून प्रसिद्ध आहे. यात बहादूरशहा जफर, नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, झलकारीबाई, व त्या टोपे यांचे विशेष योगदान आहे. तो इतिहास येथील भारतीयांना माहित होता. तसेच तंट्या भील उर्फ भीमा नायक, चंद्रशेखर आझाद, भगतसिंह, राजगूरू, सुखदेव यांना देश विसरला नव्हता.त्यांनी केलेलं प्राणांच बलिदान येथील भारतीयांच्या रक्तात होता. याच बलिदानाचा इतिहास आळवू आळवू देश

अंकुश शिंगाडे

गांधीजींच्या नेतृत्वात एकत्र झाला होता. मग कित्येक नेते लढले. नेत्यांची धरपकड होताच साताऱ्यात नाना पाटील, नागपूरमध्ये मगनलाल बागडी, सेलोकर गुरुजी यांनी मोर्चा सांभाळला. तसेच यामध्ये बरीच मंडळी शहीदही झाली. तसेच चिमूरमध्येही बरीच मंडळी शहीद झाली.

१८५७ ते १९४२ पर्यंतचा इतिहास रक्तरंजितच होता. कित्येक भारतीय अहिंसक मार्गानं जरी इंग्रजांचा विरोध करीत असले तरी ते गोळ्या झाडत असत. सायमन कमीशनमध्ये लाला लजपतराय यांनी सायमन गो बैक म्हणत मिरवणूक काढताच त्यांना लाठीमार करुन घायाळ केलं होतं,त्यातच त्यांचा मृत्यू झाला. जालियनवाला बागेतही तेच घडलं. म्हणून आठ ऑगस्टला झालेल्या बैठकीत प्रस्ताव पारित झाल्यानंतर करो या मरो असा आदेश देत नेत्यांनी चलेजाव भारत छोडोचं आंदोलन छेडले. ही भारतीयांची इंग्रजांना एक चपराकच होती.प्रस्ताव पारित होताच व उद्या आंदोलन छेडणार आहे हे माहित होताच इंग्रजांनी येथील भारतीय नेत्यांना कैद केले. महात्माजींना पुण्याला आगाखान पैलेसमध्ये ठेवले. नेहरू तसेच इतर नेत्यांनाही पकडून देशातल्या वेगवेगळ्या तुरुंगात ठेवलं. तेव्हा महात्मा गांधी म्हणाले की आता प्रत्येकजण नेता आहे. इंग्रजांना घाबरु नका. प्रतिकार करा. स्वतःला स्वतःचा नेता समजा.

शेवटी नऊ ऑगस्टपासून सुरु झालेल्या अहिंसक आंदोलनाला पांगविण्यासाठी इंग्रज सैनिकांनी निरपराध भारतीयांवर जालियनवाला बागेसारखा गोळीबार केला. त्यात निरपराध माणसे मरण पावली.कित्येक आंदोलन करणारी आणि न करणारीही. त्यामुळे चिडून जाऊन येथील भारतीय लोकांनी टेलिफोनच्या तारा तोडल्या. कित्येक पोलीस ठाणे जाळले. सरकारी इमारती जाळल्या. कित्येक लोकं भुमीगत झाले. यात कित्येक विद्यार्थीही शहीद झाले.

जेव्हा ही घटनेची माहिती महात्मा गांधींना झाली. त्यांनी तुरुंगातच एकवीस दिवसाचं उपोषण केलं. त्यातच त्यांचं स्वास्थ बिघडलं. त्यातच ते मरण पावतील व पुन्हा देशात रोष वाढेल याचा विचार करुन इंग्रजांनी त्यांना १९४४ मध्ये तुरुंगातून सोडले. आंदोलन यशस्वी झाले नाही. मग काय भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला हिंदू महासभा, वामपंथी दल व मुस्लिम लीग नावे ठेवू लागली. पण महत्वाचं सांगायचं झाल्यास १९४२ चं आंदोलन यशस्वी जरी झालं नसलं, १८५७ सारखं...तरी त्या झालेल्या आंदोलनातून इंग्रजांना एक शिक मिळाली.ती म्हणजे आता या देशातून गेल्याशिवाय उपाय नाही.त्यांनी त्यानंतर वेगवेगळ्या बैठका घेतल्या. ज्यांनी या आंदोलनाला मदत केली नाही. त्यांनाही विचारणा करुन शेवटी भारताला स्वातंत्र्य देण्याचा निश्चय केला.त्यात काही अटीही टाकल्या. बहुतेक आजही कोहीनूर भारताचा हिरा इंग्लंडमध्ये आहे.शंकुतला एक्सप्रेसचे पैसे आजपर्यंत इंग्लंडला जात होते.

कदाचित अशाच तर अटी नव्हत्या इंग्रजांच्या की त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिलं. या देशात हिंदू-मुस्लिम भांडणं नसतांना इंग्रजांनी दोघांच्याही धर्म भावना भडकवून ज्या चाली चालल्यात. त्या चालीतून भारत पाकिस्तान बनला. तसेच अजूनही हा भारत पाकिस्तान वाद भारतात धुमसतच आहे. काल काश्मीर वाद होता. आज सीमावाद आहे. अन् आम्ही भारतीय कालही आपापसात लढत होतो. मी हिंदू, मी मुस्लिम म्हणत. आजही लढतो. कोणत्याही देशात वाईट गोष्टी घडल्याच तर त्या ते ते धर्मीय मंडळी त्या त्या धर्मांनीच केल्या असे भांडतो नव्हे तर या देशाच्या एकात्मत्तेला तोडण्याचे काम करतो.एवढंच नाही तर या देशातील शांतता भंग करतो.नेत्यांच्या आश्वासनात फसतो. नेत्यांबरोबर आपणही आपल्या महापुरुषांना शिव्या द्यायला लागतो. पण याचा विचार करीत नाही की त्या नेत्यांनी त्या काळात जे काही कार्य केले, ते अतुलनीय होते. ते नसते तर देश स्वातंत्र्यही झाला नसता. आपण गुलाम असतो इंग्रजांचे आणि आपली पिढीही गुलाम राहिली असती. देशाला स्वातंत्र्य कधीच मिळालं नसतं आजही. कारण कालच्या नेत्यात जी लढण्याची ताकद आहे. ती आजच्या नेत्यात दिसत नाही. हे नेते फक्त आश्वासन देऊ शकतात. शिव्या हासडू शकतात. **

## निवडक



### पागोटे जलतरण स्पर्धेत आर्यन चमकला

**उरण :** नारळी पौर्णिमेनिमित्त उरण तालुक्यातील पागोटे गावचे सरपंच कुणाल अरुण पाटील यांच्या सौजन्याने, कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या वतीने शुक्रवार (दि.८) ऑगस्ट रोजी पागोटे गावातील तलावामध्ये मानाची जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी पागोटे, कुंडेगाव, फुंडे हायस्कूल, जेएनपीए हायस्कूल आणि उरण तालुक्यासाठी खुला गट आशी गटवारी करून या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी माजी आ. मनोहर भोईर, भावना घाणेकर, रामदास शेवाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत आर्यन मोडखरकर याने प्रथम क्रमांक पटकावला. तर व्दितीय क्रमांक जयदीप सिंग याने मिळवला, तिसरा क्रमांक वेदांत पाटील याने तर चतुर्थ क्रमांक तेजस शिंदे मानकरी ठरला. या स्पर्धेला प्रेक्षकांनी खुप मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. याप्रसंगी इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव स्थापित करणाऱ्या रुद्राक्षी मनोहर टेमकर, मयंक दिनेश म्हात्रे या जलतरणपटुंचा सन्मान करण्यात आला.



### शाखाप्रमुख प्रिमियर लीग क्रिकेट सामने

**पनवेल :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठे शहरात रामदास गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाखाप्रमुख प्रिमियर लीग क्रिकेट सामने दि बा पाटील मैदानावर पावसाळी क्रिकेट सामने खेळविण्यात आले होते. यास्पर्धेमध्ये एकूण २६ संघ सहभागी झाले होते. यामध्ये सेक्टर ३५ शाखाप्रमुख सुरेश मोरे व विभागप्रमुख बबन गोगावले यांच्या संघानी प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक सेक्टर २१ शाखा व तृतीय क्रमांक सेक्टर ८ शाखाने पटकावला. या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज शिवा लंके ठरला. यावेळी विलास व्हावळ, प्रभाकर गोवारी, रामदास गोवारी, धाया गोवारी, जया शाहू, एकनाथ गोवारी, विजय गोवारी, महिला आघाडी, युवा सेना, ग्राहक संरक्षण कक्ष व सर्व पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण स्पर्धेसाठी संतोष गोळे यांनी अथक मेहनत घेतली.

### ज्युनियर राज्य बास्केटबॉल स्पर्धा पुणे संघाचे नेतृत्व आयुष व अक्षयाकडे

**पुणे :** पुणे जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या वतीने सुरू झालेल्या ७५व्या ज्युनियर (अठरा वर्षांखालील) गटाच्या राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्याच्या मुले व मुलींच्या संघाचे नेतृत्व अनुक्रमे आयुष जवळकर आणि अक्षया पाटीलकडे सोपविण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल



संघटनेच्या मान्यतेने चौदा तारखेपर्यंत म्हांळुगे, बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरीत बास्केटबॉल कोर्टवर होणाऱ्या या स्पर्धेसाठी पुणे जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष ललित नहाटा यांनी जाहीर केलेला पुणे जिल्हाचा संघ असा मुले : आयुष जवळकर (कर्णधार), रित्वीक ढाका, सचिन गुर्जर, आदित्य, गुलशन कुमार, अर्जुन, देवेश पाटील, रुद्र मॅथ्यू, सोहम गट, आदित्य पवार, गनित सोनी, कबीर बुट्टे. प्रशिक्षक : आकाश लोखंडे, ओंकार धाराशिवकर. मुली : अक्षया पाटील (कर्णधार), सिया शाह, सिया भोसले, सई शिंदे, त्विशा शर्मा, अनुषा सोनटक्के, आर्या फटांगरे, श्रद्धा चारक, लक्ष्मी जोशी, समीरा कदम, लिलियन जेकब, अन्वी कुलकर्णी. मुख्य प्रशिक्षक : अरुण पवार, सहाय्यक प्रशिक्षक : आकाश काळे.

### भारताची पाच पदके पक्की



**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील आशियाई मुष्टियोद्धा अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या पाच पुरुष मुष्टियोद्ध्यांनी आपल्या-आपल्या वजनी गटातील सामने जिंकत उपांत्य फेरीत मजल मारली. त्यामुळे आता त्यांची पाच पदके पक्की झाली आहेत. शिवम (५५ किलो), मौसम सुहाग (६५ किलो), राहुल पुंडू (७५ किलो), गौरव (८५ किलो) आणि हेमंत सांगवान (९० किलो) यांनी अंतिम चारमध्ये स्थान मिळवले आहे.यापूर्वी सात महिला मुष्टियोद्ध्यांनीही उपांत्य फेरी गाठून पदके निश्चित केली होती. सध्या १९ वर्षांखालील आणि २२ वर्षांखालील आशियाई मुष्टियोद्धा अजिंक्यपद स्पर्धा एकत्र आयोजित केल्या जात आहेत. २२ वर्षांखालील गटातही भारताची १३ पदके पक्की झाली आहेत. शिवमने उझबेकिस्तानच्या अब्दुलअजीज अब्दुनाझरोववर ५-० अशी मात केली, तर मौसमने किर्गिस्तानच्या मुखम्मद अलीमबेकोवला ३-२ ने पराभूत केले. राहुलने दक्षिण कोरियाच्या उंजो जियोंगविरुद्ध सामना निर्णायक क्षणी थांबवल्याने विजय मिळवला. गौरवने चिनी तैपेईच्या पुआंग याओ चेंगला हरवले, तर हेमंतने उझबेकिस्तानच्या मुहम्मदरिजो सिद्दिकोवचा पराभव केला. मात्र ९० किलोपेक्षा जास्त वजनाच्या गटात पृषला इराणच्या अब्बास घरशासबीकडून पराभवाचा सामना करावा लागला.

# चेंगराचेंगरीचा राग चिन्नास्वामीवर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वर्ल्ड कप महिला वनडे क्रिकेट स्पर्धा जेमतेम दोन महिन्यांवर आली आहे. मात्र, सलामीची आणि सांगता लढत होणाऱ्या बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमला सामन्यांच्या आयोजनाची अद्याप मंजुरी मिळालेली नाही. कर्नाटक संघटनेने या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहारास अद्याप राज्य सरकारने उत्तर दिलेले नाही. दरम्यान, भारतीय क्रिकेट बोर्डाने कर्नाटक संघटनेस शनिवारपर्यंत मुदत दिल्याचे समजते.

वर्ल्ड कपच्या लढतीबाबत आम्ही राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. त्यांच्या उत्तराची आम्हाला प्रतिक्षा आहे. त्यांनी उत्तर दिलेले नाही म्हणजे परवानगी नाकारली असे नव्हते. महाराजा टी-२० क्रिकेट स्पर्धा घेण्यास विरोध असता तर त्यांनी म्हैसूर येथील सामन्यांनाही मंजुरी दिली नसती. वर्ल्ड कपमधील लढतींसाठी अजून वेळ आहे. आम्ही एकावेळी एकच पाऊल टाकत आहोत, असे कर्नाटक क्रिकेट संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



वर्ल्ड कप स्पर्धेतील बेंगळुरूची सलामीची लढत ३० सप्टेंबरला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यात ही सामना आहे. त्यानंतर ४ ऑक्टोबरला इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका एकमेकांविरुद्ध खेळतील. या स्पर्धेतील अखेरची साखळी लढत २६ ऑक्टोबरला आहे. तो सामना भारत आणि बांगलादेश यांच्यात आहे. त्यानंतर ३० ऑक्टोबरला स्पर्धेतील पहिली उपांत्य लढत होईल आणि पाकिस्तान अंतिम लढतीस पात्र न ठरल्यास २ नोव्हेंबरची अंतिम लढतही बेंगळुरूलाच होणार आहे.

### स्पर्धेसाठी चेन्नई, हैदराबादचा पर्याय

**भारतीय क्रिकेट बोर्डाने काही दिवसांतील घडामोडी लक्षात घेऊन चिन्नास्वामी स्टेडियमऐवजी अन्यत्र लढती घेण्याबाबतच्या पर्यायाबाबत विचार सुरू केला आहे. त्यात चेन्नई आणि हैदराबाद आघाडीवर आहेत. चेन्नईत ऑक्टोबरमध्ये पावसाची शक्यता असते, त्यामुळे हैदराबादला पसंती मिळण्याची शक्यता आहे.**

महाराजा टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी चिन्नास्वामी स्टेडियमवरील लढतीस परवानगी मिळालेली नाही याची दखल भारतीय क्रिकेट बोर्ड आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने घेतली आहे. त्यांचे तेथील घडामोडींवर लक्ष आहे. आयसीसीने याबाबत बीसीसीआयकडे विचारणाही केली आहे. स्पर्धा जेमतेम सात आठवड्यांवर आली आहे. त्यामुळे बीसीसीआयने कर्नाटक संघटनेस आज, शनिवारपर्यंत मुदत दिली आहे.

कर्नाटक सरकारच्या नियुक्ती आयोगाने सादर केलेल्या अहवालात चिन्नास्वामी स्टेडियमवर गर्दीचे कार्यक्रम घेण्यास विरोध केला आहे. हा अहवाल कर्नाटक सरकारने न्यायालयात सादर आहे. चिन्नास्वामी स्टेडियम परिसरात झालेल्या चेंगराचेंगरीबाबत ११ ऑगस्टला सुनावणी आहे.

> **आम्ही कर्नाटक संघटनेसह यापूर्वीच चर्चा केली आहे. त्यांना अजूनही वर्ल्ड कप सामन्याच्या आयोजनासाठी मंजूरी मिळालेली नाही. वर्ल्ड कप स्पर्धा ३० सप्टेंबरपासून आहे. आयसीसीला लढतीच्या आयोजनाबाबत कोणतेही प्रश्न नको आहेत. त्यामुळे आम्ही कर्नाटक संघटनेस शनिवारपर्यंत मुदत दिली आहे. -देवजित सैकिया, सचिव भारतीय क्रिकेट बोर्ड**

## आशियाई करंडकाची रंगीत तालीम

### हरमनप्रीत ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी सज्ज

**| बंगळूर | वृत्तसंस्था |**

आशियाई हॉकी करंडक यंदा भारतातील बिहारमधील राजगीरमध्ये २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान रंगणार आहे. त्याआधी भारतीय पुरुष हॉकी संघ १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान चार सामन्यांची मालिका खेळणार आहे. हाच धागा पकडून भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग म्हणाला, की ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य देशाविरुद्ध चार सामने त्यांच्याच घरामध्ये आम्ही खेळणार आहोत. या मालिकेत आमच्या संघाला खेळामध्ये सुधारणा करता येणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका आमच्यासाठी आशियाई करंडकाची रंगीत तालीम ठरणार आहे. भारतीय हॉकी संघ ऑस्ट्रेलियामध्ये पर्थ येथे चार सामन्यांची मालिका खेळणार आहे. ऑस्ट्रेलियाला रवाना होण्याआधी हरमनप्रीत याने आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या. तो याप्रसंगी म्हणाला, की ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध त्यांच्याच घरामध्ये



#### भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेचे वेळापत्रक

पहिला सामना - १५ ऑगस्ट, दुसरा सामना - १६ ऑगस्ट, तिसरा सामना - १९ ऑगस्ट, चौथा सामना - २१ ऑगस्टला होणार आहे.

खेळणे आव्हानात्मक असणार आहे. आशियाई करंडकाआधी आम्हाला तगड्या आव्हानाचा सामना करावयाचा आहे. आमच्यासाठी ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका महत्त्वाची ठरणार आहे. सांघिक कामगिरीत सुधारणा करण्याचा प्रयत्न असणार आहे. आमच्या खेळाडूंचा कसही लागेल. आशियाई करंडकाआधी आम्हाला हेच हवे होते.

आशियाई करंडक ही आशियातील अत्यंत प्रतिष्ठेची स्पर्धा समजली जाते. त्यामुळे या स्पर्धेमध्ये भारतीय हॉकी संघाकडून मोठ्या आशा बाळगल्या जाणार आहेत. ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या मालिकेत भारतीय हॉकी संघातील खेळाडू व प्रशिक्षक स्टाफ यांच्यामध्ये समन्वय योग्यरितीने साधला जाण्याची आशा आहे.

## जुहूत लाखमोलाची कॅरम स्पर्धा

**नवी दिल्ली :** जुहू विले पार्ले जिमखाना तसेच महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या विद्यमाने येत्या १६ ते १८ ऑगस्टदरम्यान जुहू विलेपार्ले जिमखाना येथे राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटांत ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेतील प्रत्येक गटातील पहिल्या आठ खेळाडूंना मिळून एपंदर एक लाख १० हजारांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशन, पारेख महल बिल्डिंग, सखाराम कीर मार्ग, आश्रय हॉटेलच्या मागे, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे सायंकाळी ६ ते ८ दरम्यान उपलब्ध असून इच्छुकांना ६ ऑगस्टपर्यंत नावे नोंदवता येतील. अधिक माहितीसाठी ९९८७०४५४२९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## ब्रिस्बेनवरचाच 'महा'विजय



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इंग्लंडविरुद्ध ओव्हलवर मिळवलेल्या विजयाने सारेच भारावले आहेत. अनेकांनी हा आजवरचा महाविजय असल्याचे कौतुकही केलेय. पण भारताचा माजी कसोटीपटू सबा करीमच्या मते ओव्हल नव्हे, तर २०२१ मधील बॉर्डर-गावस्कर मालिकेत गॅबावर (ब्रिस्बेन) ऑस्ट्रेलियाविरुद्ध मिळवलेला तीन विकेट्सचा विजय अधिक प्रभावी होता. त्या विजयानंतर हिंदुस्थान हा ३२ वर्षात ब्रिस्बेनमध्ये कसोटीत ऑस्ट्रेलियाला पराभूत करणारा पहिला संघ ठरला होता. त्यामुळे ओव्हलपेक्षा ब्रिस्बेनवरचा महाविजय आहे.

ओव्हलवरील विजय भारतीय चाहत्यांच्या आठवणीत अनेक वर्षे राहील, पण गॅबावरचा विजय त्याच्यापेक्षा संस्मरणीय आहे. ऑस्ट्रेलियात यापूर्वी असे कधी घडले नव्हते आणि तेही अत्यंत तरुण संघासोबत, ज्यातील बहुतांश नियमित खेळाडू दुखापतीमुळे बाहेर होते. भारतासाठी अशा प्रकारचा विजय अविश्वसनीय होता. एखाद्या संघाची खरी प्रगती तेव्हा दिसते, जेव्हा एक-दोन मुख्य खेळाडू अनुपस्थित असतानाही संघ उत्तम कामगिरी करतो आणि सामने जिंकतो, असे सबा म्हणाला.

## संजूचा राजस्थान रॉयल्सला रामराम

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स फ्रँचायझीमध्ये मेगा लिलावापूर्वी खेळाडूंच्या रिटेन आणि रिलीज प्रक्रियेत कर्णधार संजू सॅंसॅमसनची महत्त्वपूर्ण भूमिका होती. मात्र आता तोच संघासोबत राहणार नाही, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. संघात आधीच संजू आणि यशस्वी जैसवाल हे दोन सलामीवीर असून, ध्रुव जुरेलला वरच्या क्रमांकावर खेळवण्याची योजना आहे. त्यात वैभव सूर्यवंशी चांगल्या फॉर्मात असल्याने सलामीच्या जागेवर तिढा निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर संजूला राजस्थान रॉयल्स सोडायची इच्छा असल्याचा खळबळजनक दावा भारताचा माजी क्रिकेटपटू व समालोचक आकाश चोप्रा याने केला.



गेल्या काही दिवसांपासून राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यात घडामोडींना वेग आला आहे. दोन दिवसांपूर्वीच फ्रेंचायझीकडून ट्रेडिंग विंडोमध्ये संजू सॅमसन किंवा इतर कोणत्याही खेळाडूला ट्रेड न करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता, मात्र गुरुवारी संजूनं फ्रेंचायझीला पत्र लिहून स्वतला रिलीज करण्याची विनंती केल्याची माहिती समोर आली. संजू २०२६ साली राजस्थानकडूनच खेळणार की दुसऱ्या संघात जाणार याचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही.

आकाश चोप्राने एका मयूट्यूबफ चॅनेलवर सांगितले की, संजूने २०१३ ते २०१५ या काळात राजस्थान रॉयल्सचे प्रतिनिधित्व केले. त्यानंतर दोन हंगाम तो दिल्ली डेअरडेव्हिल्सकडून खेळला होता.

## ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघात भारतीय वंशाचे खेळाडू

**| मेलबर्न | वृत्तसंस्था |**

भारताच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघाची निवड शुक्रवारी करण्यात आली. ऑस्ट्रेलियाच्या या संघामध्ये भारतीय वंशाच्या खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे. यामध्ये यश देशमुख व आर्यन शर्मा या दोन खेळाडूंचा समावेश आहे. आर्यन शर्मा हा व्हिक्टोरिया संघामधून फलंदाजाची भूमिका बजावतो.

यश देशमुख हा अष्टपैलू खेळाडू आहे. तो न्यू साऊथ वेल्स संघामधून खेळतो. ऑस्ट्रेलियाच्या वरिष्ठ संघाचे माजी प्रशिक्षक टीम निल्सन यांच्याकडे ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघाचे प्रशिक्षकपद



सोपवण्यात आले आहे. भारत १९ वर्षांखालील संघ आणि ऑस्ट्रेलियन १९ वर्षांखालील संघ यांच्यामध्ये तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होणार आहे. तसेच दोन देशांमध्ये दोन चारदिवसीय सामन्यांची मालिकाही खेळवण्यात येणार आहे. दोन देशांमधील एकदिवसीय सामन्यांची मालिका ब्रिस्बेन येथे २१, २४ व २६ सप्टेंबरला पार पडेल. पहिला चारदिवसीय सामना ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. तसेच दुसरा चारदिवसीय सामना ७ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर यादरम्यान रंगेल. पहिला चारदिवसीय सामना ब्रिस्बेन येथे, तर दुसरा चारदिवसीय सामना मॅके येथे खेळवण्यात येणार आहे.

**ऑस्ट्रेलियाचा संघ : सिमॉन बज, लेक्स टर्नर, स्टीव हॉगन, विल मालाजझूक, यश देशमुख, टॉम हॉगन, आर्यन शर्मा, जॉन जेम्स, हेडन शिलर, चार्ल्स लाचमुंड, बेन गॉर्डन, विल बायरोम, कॅसे बार्टन, लेक्स ली यंग, जेडन ड्रेपर. पर्यायी खेळाडू : झेड होलिक, टॉम पेडिंग्टन, ज्युलियन ऑसबोर्न यांचा संघात समावेश कोला आहे.**

## शेवटच्या चेंडूवर थरारक विजय

**नवी दिल्ली :** मेन्स क्रिकेटमध्ये शेवटच्या चेंडूवर सिक्स मारुन मॅच जिंकल्याच्या घटना आपण आतापर्यंत अनेकदा पाहिल्या आहेत. पण महिलांच्या टी-२० मॅचमध्ये ८ ऑगस्ट रोजी पहिल्यांदा असं घडले. आयर्लंडच्या एका महिला गोलंदाजाने हा कारनामा करुन दाखवला. तिने पाकिस्तान विरुद्ध दुसऱ्या टी-२० सामन्यात शेवटच्या चेंडूवर सिक्स मारुन विजय मिळवून दिला. सोबतच असा कारनामा करणारी ती जगातील पहिली महिला खेळाडू ठरली आहे. टी-२० मध्ये सिक्स मारुन मॅच जिंकवण्याचा कारनामा आतापर्यंत महिला क्रिकेटमध्ये झाला नव्हता. आयर्लंडच्या टीमने पाकिस्तान विरुद्ध तीन सामन्यांच्या टी-२० सीरीजमध्ये विजयी आघाडी घेतली आहे.

### अनेकांनी घेतला स्पर्धेत सहभाग | स्पर्धेचा मानकरी अलिबागचा अजीत असिफ

# रेवदंड्यात नारळ फोडी उत्साहात साजरी

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मोबाईल व आधुनिकतेच्या जगतामध्ये पारंपारिक खेळ कालबाह्य होण्याच्या वाटेवर आहेत. मात्र आजही नारळी पौर्णिमेनिमित्त नारळ फोडीचा खेळ मोठ्या उत्साहात खेळला जात आहे. अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे नारळ फोडीची स्पर्धा पार पडली. या स्पर्धाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी एक वेगळा उत्साह स्पर्धकांसह या स्पर्धेचा आनंद घेणाऱ्या प्रेक्षकांमध्ये दिसून आला होता. या स्पर्धेत अलिबाग येथील अजीत असिफ यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.



नारळ पौर्णिमेचे औचित्य साधत नारळ फोडीचा स्पर्धा जिल्हयात विशेष करून अलिबाग, रेवदंडा, नागाव, आक्षी या भागात मोठ्या प्रमाणात घेतली जाते. पुर्वी ३५ ते ४० वयोगटातील मंडळी हा खेळ खेळत होती. एक आनंद म्हणून या खेळाकडे पाहिले जाते. मात्र, गेल्या काहीवर्षापासून या खेळाला स्पर्धेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. मोबाईलमध्ये रमणारी तरुणाई देखील नारळ फोडीच्या स्पर्धेत सहभाग घेत आहे. या स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धकाला मोठ मोठे बक्षीस दिले जात आहे. त्यामुळे या खेळाला एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

रेवदंडा येथे नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने कै. संजय म्हात्रे स्मृती चषक गडगडी नारळ फोडी स्पर्धा आयोजित करण्यात आली. रेवदंडा-चौल ग्रामस्थांचे वतीने शुक्रवारी (दि.८) आंग्रेनगर येथील पटागंणात दुपारी ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकूण ३२ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेत प्रथम क्रमांकास रोख २५ हजार रूपये व भव्य चषक व स्मार्ट फोन, व्दितीय क्रमांकास रोख १५ हजार रूपये व भव्य चषक, तृतीय क्रमांकास रोख १० हजार रूपये व भव्य चषक, चतुर्थ क्रमांकास रोख ५ हजार रूपये व भव्य चषक ठेवण्यात आले होते. या स्पर्धेत अलिबाग येथील अजीत असिफ यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. व्दितीय क्रमांक थेरोंडामधील एकविरा, तृतीय क्रमांक चौलमधील संदेश गायकर यांच्या संघाने यश मिळविले. तसेच उत्कृष्ट नारळ -अजीत वर्तक, लिजेंड चषक -चंद्रकांत धाटावकर, उत्कृष्ट मारेकरी-साहिल बनिया, शिस्तबध्द संघ-निखिल वारगे यांची निवड करण्यात आली.

स्पर्धेचा बक्षिस वितरण कार्यक्रम शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, रेवदंडा शेकापक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते संदिप खोत, रमेश वार्डे, पोलीस पाटील अनंत पाटील, मुज्जफर मुकादम, ग्रा.प.सदस्य सुराराम माळी, आदी मान्यवरउपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)